

# तृप्ति

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ९६३३
१९६१

REFBK-0011978
REFBK-0011978

তৃপ্তি

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 36355 वि: काव्य
क्रमांक 9833 नों दि 9-2-9948

# तृप्ति

निवडक कविता

सौ. सुहासिनी इर्लेकर
बी. ए. बी. एड्.

प्रस्तावना

वि. स. खांडेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
99868

REFBK-0011978
REFBK-0011978

कुलकर्णी ग्रंथागार पुणे

किंमत दोन रुपये.

प्रकाशक

पंडित अनंत कुलकर्णी
कुलकर्णी ग्रंथागार
१८६ शनवार, पुणें २

० ० ०

सर्व हक्क

यशवंत ब. इर्लेकर
बी. ए. बी. एड्. एल्.एल्. बी.
विकासगट अधिकारी
यांचे स्वाधीन

० ० ०

प्रथमावृत्ति
२२ नोव्हेंबर १९६१

० ० ०

मुद्रक

ना. अ. मेहेंदळे
जीवन मुद्रणालय,
५५१ बुधवार,
पुणें २.

# कवितानुक्रम


| | |
|---|---|
| १ तृप्ति | १७ |
| २ जातांना जा | १८ |
| ३ यौवन | १९ |
| ४ समुद्रमंथन | २० |
| ५ पूस खुणा | २३ |
| ६ संध्या | २५ |
| ७ साद | २७ |
| ८ प्रकाशाकडे | २८ |
| ९ तीट जरा लावुं दे | ३० |
| १० माझें मीपण गळून जावें | ३१ |
| ११ प्रीति | ३३ |
| १२ दिवस असावा | ३५ |
| १३ तुझ्यांत मीं वितळावें | ३६ |
| १४ स्पंदन | ३८ |
| १५ यौवन वळणावर | ४१ |
| १६ रूप आजच्या जगाचें | ४२ |
| १७ सह्याद्रीचा कडा | ४४ |
| १८ गाऊं भारत यशगुणगान | ४५ |
| १९ अशीच माझी रात्र संपते | ४८ |
| २० मुखवटा | ४९ |
| २१ मीहि अशीच उन्मन | ५१ |
| २२ क्रंदन | ५२ |
| २३ कशी ठेवूं पाय | ५५ |
| २४ सौदामिनी | ५६ |

| | | |
|---|---|---|
| २५ | आणि मला कळतसे | ५७ |
| २६ | ऐल तिराच्या पैलतिरावर | ५८ |
| २७ | आतां युगायुगासम | ५९ |
| २८ | बुद्धचरित गाउं या | ६० |
| २९ | फार दिवसांनीं आली | ६१ |
| ३० | संत विनोबा | ६२ |
| ३१ | सांत्वन | ६३ |
| ३२ | दुःख | ६४ |
| ३३ | सुख | ६५ |
| ३४ | स्मृति | ६६ |
| ३५ | आतां वेदनेला पंख फुटले | ६७ |
| ३६ | माझा मराठाचि बोल | ६८ |
| ३७ | आवाहन | ७० |
| ३८ | जीवित बनतें बिंदु केवळ | ७१ |
| ३९ | गंधगीता | ७२ |
| ४० | अजून | ७३ |
| ४१ | विरलेल्या गारा | ७५ |
| ४२ | पायवाट | ७६ |
| ४३ | तुझ्या माझ्या अबोल्यांत | ७७ |
| ४४ | मंचक प्रभुचा रिता कां ? | ७८ |
| ४५ | छबकडी पतंगडी | ८० |
| ४६ | संकेत | ८२ |
| ४७ | आज वेळ नाहीं मला | ८४ |
| ४८ | आधार | ८६ |
| ४९ | बेहोष | ८७ |
| ५० | निरोप | ८८ |
| ५१ | भास | ९० |
| ५२ | माझ्या कवनांत असो | ९१ |
| ५३ | महाराष्ट्र गीत | ९२ |

——:०:——

या संग्रहांतील–तृप्ति–जातांना जा–पूस खुणा–तीट जरा लावूं दे–स्पंदन–तुझ्यांत मीं वितळावें–कशीं ठेवूं पाय–गाऊं भारत यश गुणगान–मुखवटा–क्रंदन–स्मृति–संत विनोबा–माझा मराठाचि बोल–संकेत–तुझ्या माझ्या अबोल्यांत–मंचक प्रभुचा रिता कां ?–निरोप–भास–आज वेळ नाहीं मला–माझ्या कवनांत असो–फार दिवसांनीं आली–महाराष्ट्र गीत–हीं काव्यें भारतीय नभोवाणीच्या सौजन्यानें–

# शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २१ | २ | जिवांच | जिवांची |
| २३ | १६ | मदिरही | मदिराही |
| २६ | ५ | तभीं | नभीं |
| २७ | १९ | आवळीत | आळवीत |
| ३२ | ४ | मलित | गलित |
| ४१ | ९ | रंगपरानें | रंगपरागें |
| ४२ | १९ | काढायचें | कढायचें |
| ४४ | १८ | अंधरीं | अधरीं |
| ४६ | १७ | प्रभात प्रभात | प्रभात |
| ४९ | ५ | हृसावयला | हसावयाला |
| ६० | १ | भारतजनक | भारतजन |
| ६७ | ११ | मग | मन |
| ६९ | २० | व्हास | व्हाल |

ती. आईस,



— सौ. सुहासिनी

# निवेदन

'तृप्ति' हा माझा पहिला काव्यसंग्रह रसिकांपुढें ठेवीत असतां माझें अंतःकरण संकोच, कृतज्ञता व हर्ष यांनीं भरून येत आहे. या काव्यसंग्रहांतील बऱ्याच कविता स्त्री, मनोहर, किर्लोस्कर, प्रतिष्ठान, वाङमयशोभा व रोहिणी आदि मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत.

काव्यलेखनाच्या बाल्यावस्थेंतहि पू. श्री. वि. द. घाटे व कविवर्य श्री. बा. भ. बोरकर यांच्यासारख्या थोर साहित्यिकांनीं आपुलकीनें व मोठचा आस्थेनें मला वेळोवेळीं प्रोत्साहन दिलें. तसेंच, डॉ. वि. म. कुलकर्णी व प्रा. भगवंत देशमुख यांनींही मला प्रेमळ मार्गदर्शन केलें. या सर्वांची मी मनःपूर्वक आभारी आहें.

महाराष्ट्राचे थोर साहित्यिक पू. श्री. वि. स. तथा भाऊसाहेब खांडेकर यांनीं माझ्या काव्यसंग्रहास प्रस्तावना लिहिण्याचें मोठचा आनंदानें व आस्थेनें मान्य केलें. त्याबद्दल त्यांचे जेवढे आभार मानावेत तेवढे थोडेच ! पू. भाऊसाहेबांचीं गेलीं दोन वर्षें प्रकृती कधींच ठीक राहिली नाहीं. त्यांना स्वतःच्या लेखनाकरितांसुद्धां चार आठ दिवस निर्वेध मिळाले नाहींत. आजारांनीं सतत पाठ पुरविली, डोळ्यांमुळें लिहिणें, वाचणें फार कठीण होऊन बसलें; अशा अवस्थेंत त्यांच्या थोर अंतःकरणामुळें व प्रेमळ मनोवृत्तीमुळेंच आपलें काम बाजूस सारून, माझ्या अल्प कलाकृतीचें कौतुक करण्यासाठीं प्रस्तावना लिहिली, त्याबद्दल मी त्यांची सदैव ऋणी आहे. त्यांचे आभार मानण्यापेक्षां त्यांच्या ऋणांत रहाणें मी गौरवाचें मानतें.

माझा काव्यसंग्रह प्रकाशांत आणण्यास श्री. भगवानराव देशमुख व सौ. प्रतिभाबाई पेंडसे यांनीं अमोल सहाय्य करुन मला उपकृत केलें, त्यांचाहि नामनिर्देश करणें अगत्याचें आहे. प्रस्तुत काव्यसंग्रहाचे प्रकाशक श्री. पंडित–राव कुलकर्णी यांनीं मोठ्या आपुलकीनें प्रकाशन कार्य केल्याबद्दल त्यांचे व मुखपृष्ठचित्रकारांचेहि मी मनःपूर्वक आभार मानतें.

अखेर, माझी कविता फुलविण्याचें व प्रकाशित करण्याचें श्रेय, माझ्या पतींच्या प्रेमळ प्रोत्साहनासच आहे, हें सांगणें अप्रस्तुत ठरणार नाहीं.

अखेर ‘ तृप्ति ’ हा काव्यसंग्रह आपणासारख्या रसिक वाचकांपुढें सादर करीत आहें.

मेनरोड,<br>उस्मानाबाद.<br>दि. २६–१०–६१ } सौ. सुहासिनी इर्लेकर

क्रमांक ...२५...३.२...... नों दि १२-१-७८

# दोन शब्द

१

१९५६ सालीं उस्मानाबाद येथें पहिलें जिल्हा–साहित्य–संमेलन भरविण्याचें तिथल्या साहित्य–प्रेमी मंडळींनी ठरविलें. त्या संमेलनाचें उद्घाटन मीं करावें, अशी त्यांची इच्छा होती. प्रकृतीच्या प्रतिकूलतेमुळें माझें मन कां कूं करूं लागलें. पण मराठवाड्यांतल्या आग्रहाच्या निमंत्रणाला नकार देणें कठीण होतें. योग्य वेळीं मी संमेलनाला गेलों.

संमेलन मोठ्या उत्साहानें पार पडलें. त्या संमेलनांत उद्घाटक म्हणून मी काय बोललों किंवा दुसऱ्या दिवशीं डॉ. नांदापूरकर यांच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या माझ्या व्याख्यानाचा विषय कोणता होता, हें आतां मला स्मरत नाहीं. ती मंडपांतली गर्दी, तीं ठरावावरलीं भाषणें, हें सारें मी विसरून गेलों आहें–मात्र, या संमेलनाची स्मृति माझ्या मनांत कायम राहिली आहे ती त्यांत ऐकलेल्या एका कवयित्रीच्या काव्यगायनामुळें! तिनें म्हटलेली कविता ऐकून, त्या भरलेल्या मंडपांत आपण एका निराळ्या प्रशांत जगांत गेलों आहों, असा भास मला झाला! मीं कुतूहलानें कवयित्रीच्या नांवाची चौकशी केली. तें होतें सुहासिनी इर्लेकर.

संमेलन संपल्यावर मी कोल्हापूरला परतलों तो बार्शी लाइट रेल्वेच्या दिवसाच्या गाडीनें. डब्यांत मी एकटाच होतों. आंत धूळ भरपूर येत होती. शाळेला जायला निघालेल्या, पण रस्त्यानें रमतगमत जाणाऱ्या मुलाप्रमाणें गाडी चालली होती! भोंवतालच्या प्रदेशांत पाहण्यासारखें कांहीं नव्हतें. मन कशांतच रमेना. मी डोळे मिटून अंथरुणावर पडलों. संमेलनांत ऐकलेले ते मधुर सूर माझ्या कानांत गुणगुणूं लागले. जणूं माझी सोबत करीत ते आले होते! ती कविता नीट आठवेना! पण फुललेल्या रातराणीजवळून दूर गेलें, तरी तिचा वास जसा भोंवतालीं दरवळत आहे असा भास होतो, तसे संमेलनांत ऐकलेल्या त्या कवितेचे गोड सूर माझ्या कानांत घुमत राहिले!

दोन तपांपूर्वींचा तसलाच एक अनुभव मला आठवला. त्या दिवशीं पुण्याच्या गोखले हॉलमध्यें संजीवनी मराठे यांचें काव्यगायन मीं पहिल्यांदांच ऐकलें होतें.

साहजिकच, १९५९ अखेर आपल्या काव्यसंग्रहाला मीं प्रस्तावना लिहावी म्हणून सौ. सुहासिनी इर्लेकर माझ्याकडे आल्या, तेव्हां मला त्यांना नकार देववेना. मोतीबिंदू व प्रकृतीच्या अनेक तक्रारी यांच्यामुळें लेखनवाचनाच्या बाबतींत मी फार परावलंबी झालों आहे; हें मला कळत होतें. पण नाहीं म्हणणेंहि तितकेंच कठीण होतें.

पुढें सहा महिन्यांनीं पुस्तकाची छपाई पुरी होऊन प्रस्तावनेकरितां तें माझ्याकडे आलें. त्याचवेळीं मी रक्तदाबानें अंथरुणाला खिळून पडलों. थोडें बरें वाटूं लागल्यावर अनेकदां हें काम हातावेगळें करण्याचा मीं प्रयत्न केला. पण प्रत्येकवेळीं आजार, अडचण, असें कांहीं कांहीं उद्‌भवलें आणि हें काम लांबणीवर पडत गेलें. बाळाच्या पहिल्या वाढदिवसाला हवें असलेलें झबलें ओळखीचा शिंपी अगत्यानें शिवील, म्हणून त्याच्याकडे शिवायला टाकावें आणि दुसऱ्या वाढदिवसापर्यंतहि त्यानें तें तयार करून देऊं नये, असा प्रकार या बाबतींत झाला! या पुस्तकाच्या प्रकाशनाला माझ्यामुळें विलंब लागला.

## २

'तृप्ति' हा सौ. सुहासिनींचा पहिला काव्यसंग्रह. या संग्रहांतली कविता सामान्यत: १९५० ते १९६० या दशकांत लिहिली गेली. हें दशक मर्ढेकरांनीं रूढ केलेल्या नवकाव्याचें आहे अशी समजूत आहे. पण 'निळ्या जांभळ्या छायेंत,' 'डोळा फुटतो अंधाराला' अशी क्वचित् भेटणारी एखादी ओळ सोडली, तर आशय व अभिव्यक्ति या दोन्ही दृष्टींनीं सुहासिनींच्या कवितेवर नवकाव्याचा परिणाम झालेला दिसत नाहीं. या कवयित्रीच्या उमलत्या मनावर कुसुमाग्रज–बोरकरांच्या कालखंडाचे संस्कार मुख्यत:

झालेले दिसतात. साहित्यांत एका वेळीं अनक भिन्न प्रवाह वाहत राहतात. आपापल्यापरी ते लोकप्रिय असतात. त्यांतल्या कोणत्या प्रवाहाच्या पाण्यानें आपलें पोषण होईल, हें उदयोन्मुख प्रतिभा अंत:प्रेरणनें जाणते. सुहासिनींच्या बाबतींत तसेंच घडलें आहे.

मात्र, बोरकर–कुसुमाग्रजांच्या कवितेशीं ' तृप्ती ' चें असलेलें हें नातें आवर्जून सांगण्याची आवश्यकता नाहीं. सुहासिनींच्या रचनेंत पूर्वसूरींच्या अनुकरणाचा भाग अतिशय अल्प आहे. इथें आहे तो आत्माविष्कार------ यौवनाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या मुग्धेच्या मनापासून अवखळ बाळाचें कौतुक करणाऱ्या मातेच्या हृदयापर्यंत विविध अनुभूतींचा झालेला मनोहर आविष्कार ! मायभाषा व मायभूमि या पूजास्थानांविषयींचा जिव्हाळाहि ' तृप्तीं ' त आहे. सामाजिक अन्यायांमुळें मनांत निर्माण होणाऱ्या चिडीनें आणि सामाजिक दु:खानें कळवळून जाणाऱ्या करुणेनें इथें काव्याचें रूप घेतलेलें आढळेल. निसर्गाच्या सौन्दर्याची हांक जशी या संग्रहांत ऐकूं येते, तशीच अज्ञानाच्या आवाहनाची ओढहि त्यांत स्पष्ट होते.

' तृप्ती ' मध्यें अशी विविधता आहे. हे सर्व काव्यविषय परिचयाचे असले, तरी नित्याचेच पदार्थ सुगरिणीनें केले म्हणजे ते जसे रुचकर बनतात तसें इथें झालें आहे.

## ३

' माझ्या कवनांत असो ' या कवितेच्या शवटीं कवयित्री म्हणते, ' माझ्या कवनाचें नातें ! अक्षयाशीं अमृताशीं ! विश्वचिंतनीं दंगल्या ! संतलोचन नीरेशीं, ' या ओळींवरून कवयित्रीच्या मनाची ओढ कुठें आहे, हें उघड होतें. संतवाणीचे फार चांगले संस्कार तिच्या कवितेवर झाले आहेत. मुक्ताबाईपासून मीराबाईपर्यंतच्या कवयित्रींचें तिला आकर्षण आहे. या संग्र–, हांतल्या कांहीं कवितांवर गूढ गुंजनाची जी छाया आहे आणि ' ऐलतिराच्या

पैलतीरावर ' सारख्या कवितांत तिला अनामिकाचें जें आकर्षण जाणवत आहे त्यांचें मूळ या अंतरींच्या ओढींत आहे.

पण कांहीं झालें तरी कवयित्री ही विसाव्या शतकाच्या मध्यावर उभी असलेली, मध्यमवर्गाचें जीवन जगणारी एक सुशिक्षित स्त्री आहे. त्यामुळें प्रेम व वात्सल्य यांच्या वैयक्तिक संवेदनांपासून करुणा आणि क्रोध या सामाजिक भावनांपर्यंत सर्व प्रकारच्या अनुभूति तिला येतात. त्यांतल्या अनेक अनुभूतींनीं तिच्या हृदयाच्या तारा कंप पावतात. पण हीं कंपनें फुलपांखरासारखीं चंचल असतात. तीं सारीं शब्दांत पकडतां येत नाहींत !

कोणतीहि संवेदना जाणवणें निराळें आणि तिचें सुंदर कलाकृतींत रूपांतर होणें निराळें. एखादेवेळीं तें साधतें. अनेकदां तें मनासारखें जमत नाहीं. प्रत्येक कलावंताला येणारा हा अनुभव, ' विरलेल्या गारा ' या कवितेंत सुहासिनींनीं चटकदारपणें चित्रित केला आहे. त्या म्हणतात, गारांचा पाऊस पडत आहे म्हणून गारा वेंचायला जावें आणि त्या वेंचतां वेंचतां त्यांचें पाणी व्हावें, तसे हे अनुभव असतात !

कलेची साधना इतकी कठीण आहे, म्हणूनच तिची गोडी अवीट आहे आणि सौंदर्य अलौकिक आहे. ' भास ' व ' छबकडी पतंगडी ' या दोन्ही कवितांत हाच अनुभव कवयित्रीनें सुंदर रीतीनें व्यक्त केला आहे. ती म्हणते, ' रंगहीन जे तयांस । रंग नवे देऊं कसे । जें अमूर्त त्यास कशी । शब्दांचे देऊं ठसे ?'

४

मात्र कलावंत ज्या गारा वेंचायला जातो, त्या साऱ्याच हातांतल्या हातांत विरतात, असें नाहीं. सृष्टींत न आढळणारी किमया कवीच्या अंतःसृष्टींत घडूं शकते. तिथें या गारा मोत्यांचें रूप घेतात ! जें अमूर्त वाटत असतें तें सहज साकार होतें. सुहासिनींचीं प्रेमगीतें आणि कौटुंबिक कविता वाचतांना याची साक्ष पटते.

पैलतीरावर ' सारख्या कवितांत तिला अनामिकाचें जें आकर्षण जाणवत आहे त्यांचें मूळ या अंतरींच्या ओढींत आहे.

पण कांहीं झालें तरी कवयित्री ही विसाव्या शतकाच्या मध्यावर उभी असलेली, मध्यमवर्गांचें जीवन जगणारी एक सुशिक्षित स्त्री आहे. त्यामुळें प्रेम व वात्सल्य यांच्या वैयक्तिक संवेदनांपासून करुणा आणि क्रोध या सामाजिक भावनांपर्यंत सर्व प्रकारच्या अनुभूति तिला येतात. त्यांतल्या अनेक अनुभूतींनीं तिच्या हृदयाच्या तारा कंप पावतात. पण हीं कंपनें फुलपांखरा-सारखीं चंचल असतात. तीं सारीं शब्दांत पकडतां येत नाहींत !

कोणतीहि संवेदना जाणवणें निराळें आणि तिचें सुंदर कलाकृतींत रूपांतर होणें निराळें. एखादेवेळीं तें साधतें. अनेकदां तें मनासारखें जमत नाहीं. प्रत्येक कलावंताला येणारा हा अनुभव, ' विरलेल्या गारा ' या कवितेंत सुहासिनींनीं चटकदारपणें चित्रित केला आहे. त्या म्हणतात, गारांचा पाऊस पडत आहे म्हणून गारा वेंचायला जावें आणि त्या वेंचतां वेंचतां त्यांचें पाणी व्हावें, तसे हे अनुभव असतात !

कलेची साधना इतकी कठीण आहे, म्हणूनच तिची गोडी अवीट आहे आणि सौंदर्य अलौकिक आहे. ' भास ' व ' छबकडी पतंगडी ' या दोन्ही कवितांत हाच अनुभव कवयित्रीनें सुंदर रीतीनें व्यक्त केला आहे. ती म्हणते, ' रंगहीन जे तयांस । रंग नवे देऊं कसे । जें अमूर्त त्यास कशी । शब्दांचे देऊं ठसे ?'

४

मात्र कलावंत ज्या गारा वेंचायला जातो, त्या साऱ्याच हातांतल्या हातांत विरतात, असें नाहीं. सृष्टींत न आढळणारी किमया कवीच्या अंतःसृष्टींत घडूं शकते. तिथें या गारा मोत्यांचें रूप घेतात ! जें अमूर्त वाटत असतें तें सहज साकार होतें. सुहासिनींचीं प्रेमगीतें आणि कौटुंबिक कविता वाचतांना याची साक्ष पटते.

या दोन प्रकारच्या कवितांशिवाय इतर कवनांतहि सुहासिनींनीं विविध संवेदना आपल्या शब्दजालांत अचूक पकडल्या आहेत. 'तृप्ति' 'मीहि अशीच उन्मन,' 'पायवाट,' 'सान्त्वन,' 'कशी ठेवूं पाय ?,' आवाहन,' 'गंधगीता' या कविता या दृष्टीनें पाहाव्यात. कवयित्रीला जें जाणवलें आहे, तें तरल असूनहि तिनें सहजसुंदर रीतीनें व्यक्त केलें आहे.

'तृप्ति' ही पहिलीच कविता घ्या. साने गुरुजींच्या 'तृणाची थोरवी' या ललित लेखांतल्या तृणाइतकेंच या कवितेंतलें तृणहि रसिकांना आवडेल. आभाळ भरून आलेलें आहे, पाऊस कोसळत आहे, पंचमहाभूतें प्रक्षुब्ध झालीं आहेत. समुद्र–डोंगर, क्षितिज–आकाश, वारा–वड, हीं सारीं आपापल्यापरी असंतुष्ट आहेत, यांपैकीं प्रत्येकाला सृष्टीच्या संसारांत मानाचें स्थान असूनहि त्याची तक्रार सुरू आहे. कुरकुर करीत नाहीं फक्त गवताचें पातें ! कुठेंतरी सांठलेल्या पाण्यांत उभें असलेलें हें पातें समाधानी आहे. तें या वृष्टीचा आनंद लुटीत आहे. या आनंदाचें वर्णन कवयित्रीनें असें केलें आहे--

तुडुंबलें जळ त्यांत। उभें हरखुन तृण

टाळ्या पिटीत वदलें। 'किती सुंदर जीवन !'

असामान्यांच्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर सामान्याची ही समाधानी वृत्ति कवयित्रीनें रेखाटल्यामुळें, तिची गोडी वाढली आहे. एखाद्या सुनीतांतल्या शेवटच्या दोन ओळींनीं सुंदर कलाटणी द्यावी, तसें इथें घडलें आहे. ही कविता मीं प्रथम वाचली तेव्हां माझ्या मनांत आलें,–मी चित्रकार असतों तर फार बरें झालें असतें ! कवयित्रीनें चित्रित केलेल्या भव्य पार्श्वभूमीवर 'किती सुंदर जीवन' म्हणत नाजुकपणानें डुलत उभ्या असणाऱ्या त्या गवताच्या पात्याचें चित्र मीं काढलें असतें !

'पायवाट' हीं अशीच दुसरी कविता उजाड माळावरून वळत वळत कटीच जाणारी ही पाउलवाट वाचतां वाचतां प्रतीकात्मक बनते-जगांतलें

एकलेपणाचें दुःख, मनुष्याच्या अंतरींची दुसऱ्याच्या सोबतीची नाजुक ओढ या कवितेंत गोड रीतीनें सूचित झाली आहे. एकटीच जीवन कंठणारी ही उदास पाऊलवाट आणि तिला होणारा एखाद्या अवखळ वासराच्या खुरांचा ओझरता स्पर्श यांचें चित्रण कवयित्रीनें असें केलें आहे--

क्वचित् अवचित येतें उधळत
उनाड चुकलेलेंच वांसरू
निमिषांतच परि परते दौडत
रित्या मनीं घुमवीत घुंगरू !

५

वर उद्धृत केलेल्या सुंदर कडव्याला, 'तीट जरा लावुं दे' या कवितेचें वर्णन केलेल्या मातृवात्सल्यानेंच कीं काय, कवियित्रीनें एक लहानसें गालबोट लावलें आहे ! तें 'क्वचित्' या शब्दाचें. सर्वसामान्य कवीच्या बाबतींत मीं हें म्हटलें नसतें. पण सुहासिनींच्या कवितांत असावरी, पूरिया इत्यादि रागांचे जे उल्लेख येतात, ते केवळ पांडित्य प्रदर्शक नाहींत. त्यांच्या रचनेंत स्वभावसहज संगीत आहे. या संग्रहाचें कुठलेंहि पान उघडून पाहावें. वेंचक फुलें गुंफून माळ करणाऱ्या फुलवेड्या स्त्रीचें मन या कवियित्रीपाशीं आहे, हें चटकन् लक्षांत येतें ! 'तुझ्या माझ्या अबोल्यांत । हवी हरिणीची दिठी', 'चैत्र झाला चित्र ओलें पेटल्या गुल्मोहराचें', 'पवनाच्या पावरीला साथ आहे द्यावयाची । सरितेच्या संगीताची लय जरा आणायची', 'कैलांसांतिल शिल्पगुच्छहि । बघतां बघतां सजीव झाले', 'माझें कोंसळलें नभ। ओंजळींत ओसंडत। सावरीतां सावरीतां । पायतळीं उगवत', 'शुभ्र धुक्याची मृदुल ओढणी। ओढुनि माथ्यावरी सैलशी', या ओळी किंवा 'कशी ठेवूं पाय ?' सारख्या कविता वाचल्या म्हणजे सुहासिनींच्या रचनेंतलें माधुर्य केवळ परंपरागत, गोड गोड शब्द वापरण्याच्या लकबेंतून आलेलें नाहीं, हें

सहज लक्षांत येतें. मनांतला भाव सुंदर शब्दांनीं व्यक्त करण्याची शक्ति आणि तिच्या जोडीला असलेली संगीतभक्ति यांच्यांतून हें माधुर्य निर्माण झालें आहे. त्यांच्या कवितेंत या बाबतींत साम्य आहे तें तांबे, बोरकर, संजीवनी, पाडगांवकर यांच्या कवितेशीं. एखाद्या चिमण्या झऱ्याप्रमाणें ही कविता कविमनांतून झुळझुळत बाहेर येते !

६

सुगरिणीला नाना प्रकारचे पदार्थ करून पहावेसे वाटतात. सुहासिनींनींहि तशी विविध प्रकारची कविता लिहिली आहे. 'समुद्रमंथन', 'स्पंदन', 'रूप आजच्या जगाचें', 'मुखवटा', 'क्रंदन' अशा सामाजिक कविता या संग्रहांत आहेत. 'गाऊं भारत यशगुणगान', 'माझा मराठाचि बोल', 'अजून', 'महाराष्ट्र गीत' अशीं मातृभूमीचीं व मातृभाषेचीं स्तोत्रेंहि इथें आहेत. 'दिवस असावा', 'सह्याद्रीचा कडा', 'सौदामिनी', 'माझें मीपण गळून जावें', 'ऐलतिराच्या पैलतिरावर' इत्यादि कवितांत सृष्टिसौन्दर्य आणि गूढगूंजन या क्षेत्रांत त्या पाऊल टाकतात. 'प्रकाशाकडे', 'बुद्धचरित गाऊं या', 'बिनोबा' इत्यादि कवितांत जुन्या–नव्या विभूतींचें पूजन करतात. ही रचना सफाईदार आहे. त्यांतली कांहीं गेय असल्यामुळें सभा–समारंभांत लोकप्रिय होण्यासारखी आहे. पण 'तृप्ति' 'पायवाट', 'मीहि अशीच उन्मन', 'तुझ्यांत मीं वितळावें,', 'तुझ्या माझ्या अबोल्यांत', 'तीट जरा लावुं दे', 'निरोप' या कवितांत जी सरसता आहे, ती या रचनेंत जाणवत नाहीं. या कविता वाचतांना अधूनमधून एखादी कल्पना मनाला गुदगुल्या करते. कांहीं सुरेख ओळी लक्षांत राहतात. पण एकंदर कवितेचा मनावर एकसंध परिणाम होत नाहीं.

असें कां व्हावें ?

काव्यांला अमुक विषय योग्य आहे, तमुक विषय त्याज्य आहे, असें मला वाटत नाहीं. पथ्यापथ्य विचार वैद्यकशास्त्रांत शोभून दिसतो ललित

साहित्यांत नाहीं ! काव्य जसें मुग्ध प्रीतीनें रंगतें तसें तें बहोष भक्तीनेंहि सजीव होतें. सामाजिक जाणिवांच्या उन्हांत कलेच्या कळ्या करपून जातात, हें म्हणणें मला पटत नाहीं. टोलरनें एके ठिकाणीं म्हटलें आहे तें किती खरें आहे–' प्रचारालासुद्धां काव्याची पातळी प्राप्त होते. पण ती केव्हां ? तो प्रचार त्या व्यक्तीच्या काळजाच्या रक्तानें रंगला असेल तेव्हां !'

कलेमध्यें सामाजिकतेचें स्थान फार गौण आहे, हा विचार गेल्या दहा-पंधरा वर्षांतच आपल्याकडे अधिक बळावला. पाश्चात्य साहित्यशास्त्रांतील सिद्धांतावर संपूर्ण भर दिल्यामुळें हा एकांगीपणा निर्माण झाला आहे. प्रत्येक देशांतील साहित्यामागें तिथल्या कलाजीवनाची, संस्कृतीची आणि जीवन-दृष्टीची एक अखंड परंपरा असते. आपल्या हजारों वर्षांच्या या विशिष्ट वारशाकडे दुर्लक्ष करून अनेक साहित्य–सिद्धान्त सध्यां सुनावले जात आहेत ! बोरकरांची ' तेथें कर माझे जुळती ' ही कविता ' मुशाफिरा 'पेक्षां कमी प्रतीची आहे, असें प्रतिपादन केलें जातें तें या सिद्धान्ताच्या आहारीं गेल्यामुळेंच !

माझ्या मतें, त्या दोन कवितांची तुलनाच अप्रस्तुत आहे. ' कन्या सासुऱ्यासी जाय ' किंवा ' बारे पांडुरंगा केव्हां भेट देसी ' या तुकोबांच्या अभंगाशीं ' जें का रंजले गांजले ' या अभंगाशीं तुलना करून, हा दुसरा अभंग काव्यदृष्टच्या कनिष्ट प्रतीचा आहे, असें ठरविण्यांतलाच हा प्रकार आहे ! उत्कट संवेदनेंत कवीला जी अनुभूति आली असेल, त्याच्या व्यक्तित्वांतले सारे रसगंध घेऊन जी फुलली असेल तिचा विषय कोणताहि असो. तिच्यांतून निर्माण झालेलें काव्य अस्सल असतें. रसिकांना जशी सौन्दर्याची तहान असते, तशी सामर्थ्याची आणि साधुत्वाची भूकहि असते ! प्रत्येक कवि आपापल्यापरी या तहानभुका तृप्त करण्याचा प्रयत्न करीत असतो.

या बाबतींतली एक आठवण सांगण्याजोगी आहे. सहा-सात वर्षांपूर्वी एका चांगल्या कवीचा काव्यसंग्रह प्रसिद्ध व्हावयाचा होता. एक प्रख्यात टीकाकार त्याला प्रस्तावना लिहिणार होते. पुस्तकाच्या छपाईला सुरुवात झाली. मग प्रस्तावनाकार कवीला म्हणाले, ' तुमचीं प्रेमकाव्यं, निसर्गकाव्यं वगैरे सर्व या संग्रहांत राहूं देत. मात्र, त्यांत जी सामाजिक कविता आहे ती

क्रमांक ........................ नों दि ........



काढून टाका ! ' हे कवि सहज मला भेटले. आपल्यापुढें पडलेला पेंच त्यांनीं मला सांगितला. मीं त्यांना म्हणालों, ' तालीम करणारी मंडळी रोज सकाळीं इतके जोर काढायचे, इतक्या बैठका घालायच्या म्हणून व्यायाम करतात. तुम्ही सामाजिक कविता लिहितां ती अशी बैठक घालून नाहीं ना ? कांहीं-तरी सामाजिक लिहिलेंच पाहिजे, या अभिनिवेशांतून ती निर्माण होत नाहीं ना ? मग झालं ! प्रेमगीतं लिहितांना तुम्हाला जो आनन्द होतो, तोच आनन्द ही सामाजिक कविता लिहितांना झाला असेल, तर ती आपल्या संग्रहांतून तुम्ही वगळण्याचं कारण नाहीं. ज्या कविता वाचकांच्या हृदयांत प्रवेश करतील, त्यांना आनन्द देतील त्यांना क्षणभर निराळ्या जगांत घेऊन जातील, त्याच ते वाचीत राहतील. मग त्या शुद्ध सौन्दर्यदृष्टि असलेल्या कविता असोत किंवा सामाजिक जाणिवेंतून स्फुरलेल्या सुंदर कविता असोत !'

सामाजिक जाणिवेच्या या वादग्रस्त प्रश्नाची एक बाजू स्पष्ट व्हावी, म्हणून दोन उदाहरणें देतों. केशवसुतांच्या ' तुतारी 'ची उंची सर्व कडव्यांत सारखी नाहीं ! तरीसुद्धां ' प्राप्तकाळ हा विशाल भूधर। सुंदर लेणीं तयांत खोदा ' किंवा ' पूर्वीपासुनि अजुनि सुरासूर। तुंबळ संग्रामाला करिती। संप्रति दानव फार माजती। देवांवर झेंडा मिरवीती। देवांच्या मदतीस चला तर ' या कडव्यांत साठ वर्षांपूर्वी जें प्रेरक आवाहन होतें, तें अजून ओसरलेलें नाहीं. ' संप्रति दानव फार माजती ' ही ओळ लिहितांना केशवसुतांच्या डोळ्यांपुढें जें चित्र उभें होतें, त्यापेक्षां अत्यंत निराळें असें चित्र आपल्या डोळ्यांपुढें उभें राहील. अशीं नवीं नवीं चित्रें उभीं करण्याची शक्ति ज्या काव्यांत असते, तें कधींहि कोमेजून जात नाहीं ! ' प्राप्तकाल हा विशाल भूधर। सुंदर लेणीं तयांत खोदा ' या ओळींना केशवसुतांच्या काळीं जो अर्थ होता, तो स्वातंत्र्यप्राप्तीनंतर किती विशाल आणि निराळा झाला आहे, हें पाहण्याजोगें आहे. क्षणिकाचीं कुंपणें ओलांडण्याचें सामर्थ्य असलेली प्रतिभा सामाजिक अनुभूतींतून काव्य निर्माण करते ती अशी !

आपल्याच कवींची गोष्ट कशाला हवी ? व्हॅचेल लिंडसे या कवीची ' The Leaden–Eyed ' ही कविता पाहावी. ती अशी आहे—

Let not young souls be smothered out before

They do quaint deeds and fully flaunt their pride.
It is the world's one crime its babes grow dull.
It's Poor are oxlike, limp and leaden–eyed.
Not that they starve, but starve so dreamlessly.
Not that they sow, but that they seldom reap.
Not that they serve, but have no gods toserve.
Not that they die, but that they die like sheep !

लिंडसेनें इतर काय लिहिलें आहे, याची मला कल्पना नाहीं. स्वतःच्या देशांत तो कोणत्या दर्जाचा कवि मानला जातो, हेंहि मला ठाऊक नाहीं. कोणत्या विलक्षण क्षणीं त्यानें या आठ ओळी लिहिल्या, हें मला सांगतां येणार नाहीं. मी ही कविता अनेकदां वाचली आहे. पण माझ्या दृष्टीनें तिची गोडी अजून कमी होत नाहीं. तिच्या शेवटल्या चार ओळींतलें धगधगणारें तेज मंदावत नाहीं ! सात समुद्र ओलांडून माझ्यासारख्या वाचकाला ती आकृष्ट करूं शकते !

हा सर्व विस्तार मी केला तो कवितेला सामाजिक अगर अन्य कोणत्याहि प्रकारची अनुभूति वर्ज्य नाहीं, हें सांगण्याकरितां. मात्र धार्मिक, सामाजिक आणि उपदेशपर कविता यशस्वी व्हावयाला त्या विषयाचें चित्रण चालणार नाहीं. विशिष्ट उष्णतेशिवाय लोखंडाचा जसा रस होत नाहीं, तशी सामाजिक किंवा हेतुपूर्ण कविता कवीच्या उत्कट अनुभूतीशिवाय, तो आणि ती कविता एकजीव झाल्याशिवाय निर्माण होत नाहीं.

७

'समुद्र मंथन', 'स्पंदन', 'रूप आजच्या जगाचें', 'क्रंदन', 'मुखवटा' या सुहासिनींच्या सामाजिक कविता त्यांचीं प्रेम गीतें किंवा कौटुंबिक कवनें यांच्या इतकें आकर्षक वाटत नाहींत. त्यांत एकप्रकारची कोरडी अलिप्तता जाणवते. अशा कवितांत कवयित्री मुक्तछंदाचा वापर करते. एखादें रूपक योजते. तिच्या भाषेंतली प्रसन्नता इथेंहि आढळते. मधूनच एखादी

ओळ चिंतनशीलतेची जाणीव देऊन जाते. पण संपूर्ण कवितेचा मनावर सुंदर ठसा उमटत नाहीं.

'गाऊं भारत यश गुणगान', 'माझा मराठाचि बोल', 'माझ्या कवनांत असो', 'महाराष्ट्र गीत' इत्यादि कवनांत स्वभाषा, स्वदेश, स्वसंस्कृति यांच्या विषयींचा अभिमान आहे. पण काव्य म्हणून त्या मध्यम वाटतात. अशा कवनांना कधींकधीं गोड शब्दांनीं गुंफलेल्या अभिमानास्पद गोष्टींच्या यादींचें स्वरूप येतें ! संवेदनेंतून स्फुरल्याशिवाय अशा प्रकारची कविता लिहिली गेली, तर तिच्यांतलें काव्यत्व कमी होतें, हा नेहमींचा अनुभव आहे. विनायक, तिवारी इत्यादिकांची अशी पुष्कळशी कविता आज महत्वाची वाटत नाहीं याचें कारण हेंच आहे.

८

कवयित्रीला बुद्धिचरिताचें आकर्षण आहे. या संग्रहांतलीं बुद्धा-विषयींचीं तिचीं कवनें वाचनीय आहेत. पण इथेंसुद्धां वर सांगितलेली-गोष्टच अनुभवाला येते. जुन्या काळीं पद्य आणि काव्य यांच्यांतल्या सीमा-रेषांकडे दुर्लक्ष होणें स्वभाविक होतें. कारण त्यावेळीं गद्याचा विकासच झाला नव्हता. आधुनिक काव्यांतहि पद्य, गीत आणि काव्य यांच्यांतल्या मूलभूत भेदांकडे कानाडोळा करण्याची प्रवृत्ति वाढत आहे. चित्रपटांमुळें गीतांच्या लोकप्रियतेला पूर्वीं कधींहि आली नसेल, एवढी मोठी भरती आली आहे. जातिवंत कवीपेक्षां प्रतिभेचा स्पर्श झालेल्या गीतकारांना अधिक लोकप्रियता लाभत आहे ! गीत हें बहुजन समाजाला सर्वांत जवळचें वाटणारें काव्य असल्यामुळें या संक्रमणकाळांत असें होणें स्वभाविक आहे. पण सुंदर गीत आणि सरस काव्य हीं मूलतः एक नाहींत हें जर लक्षांत ठेवलें नाहीं, तर यापुढें काव्याची हानि होण्याचा संभव आहे. गीत हें चिमुकल्या रंगीबेरंगी फुलपांखरासारखें असतें ! तें या फुलावरून त्या फुलावर मुरडत, मुरकत, स्वतःभोंवतीं गिरक्या घेत जाईल. पण तें आकाशांत भरारी घेणार नाहीं ! तें काम अस्सल कवितेचें आहे. ती कधीं चंडोल

बनेल, कधीं घार होईल, एखादेवेळीं गरुड होऊन गगन गाठील ! पण कोणत्याहि रूपांत ती पृथ्वीवर घोटाळत राहणार नाहीं. केवळ फुलांभोंवतीं रुंजी घालीत बसणार नाहीं.

गीतकाराला लागणारे अनेक गुण सुहासिनींच्या ठिकाणीं आहेत. त्यांनीं गीतें अवश्य लिहावींत ! पण त्याचबरोबर सुश्लिष्ट पद्य, सुंदर गीत आणि सरस काव्य यांच्यांतल्या सीमारेषांकडे आपलें दुर्लक्ष होऊं देऊं नये.

९

या संग्रहांतील 'जातांना जा' 'फार दिवसांनीं आली,' 'तीट जरा लावु दे,' आणि 'निरोप' या कविता क्वचित् गीताच्या किंवा लोकगीताच्या सीमेवर वांवरत असल्या, तरी त्या कुणालाहि आवडतील अशाच आहेत. माहेराच्या आठवणींनीं होणारी स्त्रीची पर्युत्सुक वृत्ति राजा बढे, निकुम्ब इत्यादि पुरुष कवींच्या लोकप्रिय काव्यांचा विषय झाली आहे. मग 'जातांना जा' या कवितेंत स्त्रीमनाचा गोडवा उतरला असला तर त्यांत नवल कसलें ? भावंडें, भावजय व आई यांच्या रेखीव चित्रणामुळें ही कविता सजीव झाली आहे.

'फार दिवसांनीं आली' या कवितेंत माहेरीं आलेल्या मुलीला कुठें ठेवूं आणि कुठें ठेवूं नको, असें झालेल्या मातृमनाचें चित्रण आहे. काल्पनिकापेक्षां वास्तव काव्यानेंच कौटुंबिक कवितेची गोडी कशी वाढते, हें या कवितेंतील आईच्या पुढील उद्‌गारांवरून दिसून येईल—

'फार दिवसांनीं आली ! लेक माझी नवसाची ! नका धाडूं ग पाण्यास !
अशी उन्हाची तान्हाची.'

'निरोप' ही कविता करुण रम्य आहे. इथें रुग्णशय्येला खिळलेली पत्नी पतीचा शेवटचा निरोप घेत आहे. मृत्यूच्या भीतीपेक्षां आपल्या मागून आपल्या पतीचें आणि बाळाचें कसें होईल, या चिंतेनें ती व्याकुळ झाली

आहे. मृत्यूच्या दारांत ती मानवी मनाचे मत्सरासारखे स्वाभाविक विकार विसरते. बायकांना सवत खपत नाहीं, असें म्हणतात. पण ती आपल्या पतीला सांगते, ‘ माझा भरला संसार ! नका ठेवूं उणा बाई ! माझ्या गोड लाडक्याला ! छान एक आणा आई ’

‘ तीट जरा लावुं दे ’ मध्यें अवखळ मुलाचें कौतुक करणाऱ्या मातेचें चित्र आहे. या गीतांत आशय, आविष्कार आणि चाल यांचा मेळ चांगला पडला आहे. जें दैनंदिन, सांसारिक जीवन आपण नीरस मानतों, ठराविक चाकोरींतलें म्हणून ज्याला नाक मुरडतो, त्याच्या रुक्ष पृष्ठभागाखालीं असे अनेक कोमल काव्यविषय असतात. अति परिचयामुळें त्यांची नवलाई सामान्य मनुष्याला जाणवत नाहीं. अशा अनुभवांतलें काव्य हळुवार मनानें टिपणें सुहासिनींसारख्या कवयित्रींनाच शक्य आहे. या क्षेत्रांत त्यांच्याकडून भरीव कामगिरी होईल, अशी मला आशा आहे.

## १०

कौंटुबिक कवितांप्रमाणें सुहासिनींचीं बहुतेक प्रमगीतेंहि वेधक वठलीं आहेत. ‘ यौवन ’ , ‘ पूस खुणा ’, ‘ प्रीति ’ ‘ तुझ्यांत मीं वितळावें ’ ‘ आणि मला कळतसे ’, ‘आतां युगायुगासम’ ‘ तुझ्या माझ्या अबोल्यांत ’, ‘बेहोष’; या कवितांत प्रीतीच्या विविध छटा त्यांनीं नाजुकपणानें चित्रित केल्या आहेत. प्रेमाच्या पहिल्या वहिल्या मुग्ध जाणिवेपासून त्याच्या अंतिम सफलतेपर्यंतच्या विविध अनुभूतींचीं चित्रें या कवितांत दिसतील. ‘ तुझ्यांत मीं वितळावें ’, ‘ तुझ्या माझ्या अबोल्यांत ’, ‘ बेहोष ’ इत्यादि कविता तर वेलीवर सहज उमललेल्या फुलांसारख्या वाटतात !

## ११

सौ. सुहासिनींच्या काव्य साधनेचा हा प्रारंभ आहे. या कविमनांत संवेदना, संगीत आणि संस्कार यांचा संगम झाला आहे. ही शिदोरी सर्व साधकांपाशीं असतेच, असें नाहीं. हें पाथेय घेऊन सुहासिनींनीं आतां स्वतंत्र पाऊलवाटेनें पुढें जायला हवें. स्वतःच्या प्रकृतीशीं जुळत्या अशा प्रतिभांशीं

त्यांचा अधिक परिचय होत गेला; ( त्यांची 'पायवाट' ही कविता वाचल्यावर या कवयित्रीनें फ्रॉस्ट वाचला असता तर तिच्या कवितेनें कोणतें वळण घेतलें असतें, हा विचार माझ्या मनांत येऊन गेला होता. ) सुंदर आणि भयंकर यांचा क्षणाक्षणाला अकल्पितपणें काला करणाऱ्या या जगांत काव्याचा विषय होऊं शकत नाहीं अशी कोणतीच अनुभूति नाहीं, पण जी अनुभूति कवीच्या काळजापर्यंत जाऊन पोचत नाहीं, तिचें काव्य होऊं शकत नाहीं ही श्रद्धा त्यांच्या ठिकाणीं दृढमूल झाली, तर त्या स्वतःलाच अनेक प्रश्न विचारूं लागतील आणि त्यांची उत्तरेंहि स्वतःच शोधून काढतील. मग त्यांची कविता आविष्काराकरिता ओवी किंवा पादाकुलक यांचाच आश्रय करीत राहणार नाहीं. ती नवे नवे छंद शोधीत जाईल. त्यांच्या कवितांत केवळ मध्यमवर्गीयांच्या घरकुलांतली –– आणि तीहि एका काळच्या शांत घरकुलांतली –– नुसती चिवचिव ऐकूं येणार नाहीं. हजारों घरट्यांतले अनेक कोमल आणि करुण स्वर त्यांत निनादित होऊं लागतील ! संतयुगाच्या पार्श्वभूमीवर मराठी कवितेला आता यंत्रयुगाचें स्वागत करावयाचें आहे. या अभूतपूर्व संक्रमणकाळांत सुहासिनींना नानाविध नव्या अनुभूति आणि आविष्कार पद्धति मिळतील. या पुढच्या प्रवासासाठीं ' शुभास्ते पंथानः सन्तु ' असा आशीर्वाद देऊन मी त्यांचा निरोप घेतों.

कोल्हापूर<br>२१-१०-६१

**वि. स. खांडेकर**

# १ तृप्ति

लाट सागराची म्हणे,
"कुठे अडूं कुठे अडूं ?"
वायुलहर बोलली,
"कुठे दडूं कुठे दडूं ?"

शिरीं सावरीत ढग
उभा हताश डोंगर
पंख झुलत्या नभाला
त्याची लागली नजर.

उडणारें नभ म्हणे
"कधी पडूं कधी पडूं ?"
क्षितिजाला हुरहुर
"कधी उडूं कधी उडूं ?"

झाड वडाचें कण्हतें
"किती तिष्ठावें तिष्ठावें ?"
किती गळणारें नभ
फांदीवर सावरावें ?"

तुडुंबलें जळ त्यांत
उभें हरखुन तृण;
टाळ्या पिटीत वदलें
"किती सुंदर जीवन !"

तृ...२

## २ जातांना जा

जातांना जा माझ्या माहेरघरीं
वळणावर डौलदार निळी हवेली,
अंगणांत पारिजात शुभ्र बहरला
मोगरिच्या ताटव्यांत भृंग गुंगला
मी सुगंध अजुन जपुनि हृदयिं ठेविला
ताईने बकुळमाळ जेथ गुंफिली,
वळणावर डौलदार निळी हवेली.
गोकुळांत गोपबाळ जेथ नांदती
“ बालरूप घ्या फिरून ” काय सांगती ?
हसुन, रडुन, रुसुन, फुगुन भांडलों किती !
भाऊने “ गडीस फू ” करून रडविली,
वळणावर डौलदार निळी हवेली.
तुळशीला कोण घालितें प्रदक्षिणा ?
भक्तिभावनेंत दंगली सुलोचना;
कोण उजळिते निरांजना शुभांगना ?
वहिनी ती शोभतसे राजमहालीं,
वळणावर डौलदार निळी हवेली.
मंदिरांत दीपज्योत शांत तेवते,
की, पवित्रता समूर्त येथ नांदते ?
कोण ती, जिच्या पुढयांत विश्व रांगतें ?
माउली तुझ्या स्मृतींत लेक दंगली.

## ३ यौवन

मुग्ध तुझ्या नेत्रीं कुजबुजती
भाव नवे मज कळती ग;
तुझ्या हृदयिचीं शुभ्र पांखरें
उडुनी शिरलीं हृदयीं ग.
तुझ्या नर्तनीं गुंग जाहले
स्वरूपसुंदर मयूर ग;
नेत्रकटाक्षें मोहित झालें
हंसरें बुजरें हरीण ग.
नवथर लहरी जलवंतीवर
तरंग मम अंतरांत ग;
तव अधराची पाहुन थरथर
लवलवती नव-पल्लव ग.
तुझ्या कपोलीं लाली बघुनी
हिरमुसले बघ गुलाब ग;
अैकुनि सुस्वर कोकिला वनीं
गुणगुणते पंचमांत ग.
आलिस तूं अन् घरकुल माझें
सजलें जणुं नंदनवन ग;
रंग नवे उधळले यौवनीं
हृदयीं अमृत-रिमझिम ग.
तव आगमनें फुललें मन्मन
पावन तनुचा कणकण ग;
श्वसनाने तव, गंधित जीवन
हंसलें मम संजीवन ग.

## ४ समुद्र—मंथन

पुराणकालीं भारतवर्षांत
देव नी दानव
करीत होते समुद्रमंथन;
घुसळीत होते, घुसळीत होते,
घुसळीत होते, सागरजीवन
चाललें होतें समुद्रमंथन.
पृथ्वीने घेतल्या अनेक गिरक्या,
अनेक शतकें, अनेक युगें,
सूर्यचंद्राची आहे चालली शतपावली.
पुन्हा एकदा—
इतिहासाचें सुरू जाहलें पहिलें पान;
जुनाच ग्रंथ, जुनेंच पान
परि तयाचें नवीन पठण.
जुनेच वर्ण, जुनेच छंद,
परि तयांचा आशय नवीन.

जुनेच ढंग, जुनेच रंग,
परि तयांची संगति नवीन.

जुनेंच हासूं, जुनेंच आसूं,
परि तयाची छटा नवीन.

जुन्याच भावना—
—परि तयाचा नवा आविष्कार !

आत्माहि जुनाच—
परि तयाचा नवा शृंगार !

मानव, दानव, तोहि जुनाच;
परि तयाचा नवा प्रकार !

जुनीच कथा सुरासुरांची;
जुनीच व्यथा दुःखी जिवांच;
लक्ष्मी जुनीच,
रत्नेंहि जुनींच,
अमृत जुनेंच,
जीवन जुनेंच.
आजचा मानव, आजचा दानव,
घुसळीत आहे, घुसळीत आहे,
घुसळीत आहे सागरजीवन;
चाललें आहे समुद्रमंथन.
आजचे सागर मानवी अश्रूंचे
आजचें मंथन मानवी रक्ताचें
तयांत फिरतें चक्र यंत्राचें
स्वातंत्र्य, समता, विश्वबंधुता,
अशींच निघालीं जीवनरत्नें;
तयांची क्षणांत वांटणी जाहली
कुणी महात्मा हलाहलाचा जाहला वाली.
अजून लाभेना अमृतकुंभ,
अजून होईना शांतीचा लाभ,
आजचा मानव, आजचा दानव,
घुसळीत आहे, घुसळीत आहे,
घुसळीत आहे जीवन-सागर;
चाललें आहे जीवनमंथन.
जोवर मानवी नेत्रांत आसवें
जमती, जळती, थिजती, गोठती;
जोवर दानवी डोळयांत अंगार
जळतो, जगास जाळतो, भाजतो;
जोवर दीनांचें दैन्य सरेना
तोवर दैत्यांना दैन्य येईना



ग्रंथ संग्रहालय
ग्रं. क्र.

जोवर दानव प्रमत्त होऊन
विश्वांत घालतो विक्राळ थैमान;
जोवर कष्टाला मिळेना भाकरी
खुशाल पक्वान्न झोडतो हैवान;
जोवर मानवी जीवन रडतें
—रडतें, पडतें, तरीहि जगतें.
सडण्यावाचून दुजी ना गति
मृत्यूची अेकली तयास संगती.
सत्याला असत्य जिंकितें जोवर,
धर्माला अधर्म जाळतो जोवर,
राहू केतुच्या अधरीं अमृत—
तोवर चंद्राला, रवीला ग्रहण.
उद्याचा मानव, उद्याचा दानव,
घुसळीत राहील, घुसळीत राहील,
घुसळीत राहील जीवनसागर.
चालत राहील जीवन-मंथन !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ३५३५५...... वि: ...............
क्रमांक ......२६३३......... नों वि: ...१३...१२...८४

# ५ पूस खुणा

धुंद मत्त तव नयनशराने
विद्ध जाहलें मन्मन मृदुतर
तोंच उडालें नव जोमाने
नव आशेचें शुभ्र कबूतर.
मृदुतेचे अनुबंध तोडुनी
प्रमदे, तूं छेडिलेंस अंतर
फसवायाचें होतें तर तूं—
भुलविलेंस चंचले कशाला ?

पूस खुणा तूं कुंजवनाला
—कुंजवनांतिल फुलाफुलाला
—फुलाफुलांतिल रस-गंधाला
मोहित केलें कुणी कुणाला ?

इथेच या उपवनांत आपण
मृगकन्येला प्रीत शिकविली
लखलखतें बघतां तारांगण
सुरईतिल मदिरही सरली
रात्र रंगतां, रंगे गायन
नर्तनास नवरंगत चढली
उधळायाचा डाव तुला तर—
प्रणयाचा हा खेळ कशाला ?

पूस खुणा तूं शशिबिंबाला
—शशिबिंबाच्या करा कराला
—कराकरांतिल दीप्ति कणाला
कुणी फसविलें कसें कुणाला ?

सुरईंतिल मदिराही सरतां
प्रीतीला तव नीति स्मरली;
स्वप्नहि मोहक नेत्रीं विरतां
वास्तवता मनिं जागृत झाली;
पूर्व झळकतां क्षितिज रंगतां
नूपुरें लय-ताल विसरलीं;
मृत्यू तुजला हवाच तर तूं-
अमृतघट वर्षिले कशाला ?

पूस खुणा तूं तव गीतांना-
-तव गीतांतिल सप्तसुरांना
-सप्तसुरांतिल आर्तसुरांना
वंचित केलें कुणी कुणाला ?

## ६ संध्या

तांबुस, पिवळी, पालवलेली
चैत्रांतिल वनराई लवते;
मोहरलेली शहारलेली
मुग्ध आंबराई किलबिलते.
शीळ घालतो पिसाट वारा
तळ्यांत जलकणिका थरथरती;
भडक तांबडा हलवीत तुरा
गुल्मोहरही मान डुलविती.
अळसटलेली रानवल्लरी
कर उंचावुनि देइ जांभई;
चुळुक टाकुनी निर्झर बघतो
विहंगमाची उंच भरारी.
तांबडमाती तप्त होउनी
डोळे मिटुनी टाकी धापा;
जलवंतीही क्षणभर चळुनी
उष्ण, मंद निःश्वासी वाफा.
आंबट करुनी तोंड चुकचुके
माळावरची चिंच विशाल;
कचकचलेलें अंग घुसळुनी
पिंपळ ताणुन देई खुशाल.
सांवरीत भारा डोईवर
कुणबिण चाले संथपणाने;
शेळ्यामेंढ्या वळवित धनगर
परते तुडवित माळ मजेने.
येतो दौडत पवन कुठूनी
गिरक्या घेउन कांही वदतो;

सुम-नांच्या पर्णांच्या कानीं
अणुरेणू नवरसें बहारतो.

नववर्षाची निळी झिलाई
हळुहळु आभाळीं झळझळते;
अलगद अंबुद तभीं तरळती
श्यामल संध्या हळूच हसते.

## ७ साद

साद तुझी आली कानीं
हृदयींचा बुलबुल
भरारला आनंदाने
गात गात गुलगुल.
साद तुझी आली कानीं
क्षितिजाच्या पलीकडे,
येई मंद पाऊलानी
रात्र गुंगली इकडे.
साद तुझी आली कानीं
थरारत्या वारियांत,
कंप पावुनी लाटांनी
सप्तसूर आळवीत.
साद तुझी आली कानीं
गात विश्वसंगीताला;
गुंगवीत गुंजनानी
धुंद स्वर्गगंधर्वाला
साद तुझी आली कानीं
सुंद सुप्त पुष्पांतून,
आवळीत आसावरी
मंद मंद श्वासांतून.
साद तुझी आली कानीं
विशालशा व्योमांतून,
अनामिका, सांग तूंच
येउं मी कशी, कोठून ?

## ८ प्रकाशाकडे

तिमिर धुक्यांतच गुरफटलेली
'कपिलवस्तु' पेंगुळली होती;
जीवित–जाणिव विरघळलेली
स्वप्निल सृष्टी उमलत होती.

प्रशांत नभःप्रांगणीं चंद्रमा
तेवत होता, विलसत होता;
अवनीवरही 'कपिलचंद्रमा'
जागत होता, जागृत होता.

द्वंद्व पेटलें होतें हृदयीं
अनासक्ति अन् आसक्तीचे;
उमटत नुमटत होते नयनीं
ाव गूढ नी अगूढतेचे.

तारुण्याची सळसळ होती
जरा–मृत्युची थरथर होती;
जीवन होतें– जाणिव होती
जीवन नव्हतें– जाणिव होती.

तोंच अचानक चमकुन क्षणभर
दृष्टिक्षेप टाकला दूरवर;
अन् वदला हा हळूंच "हें तर
यशोधरेचें मंदिर सुंदर !"

विचलित होतां भाव मनींचे
चित्तहि झुकलें यौवनाकडे;
नकळत वळले चरण तयाचे
प्रिय कांतेच्या मंदिराकडे.

रत्नदीप होते थिजलेले
प्रकाशज्योती मंद जाहल्या;
यशोधरेचे श्वास मिसळले
श्वासामध्यें सिद्धार्थाच्या.

रत्नजडित मृदु मंचकावरी
होती निद्रित यशोधरा ती;
पुढयांत होता शांत पहुडला,
गोजिरवाणा अन् राहुलही.

ती कोमलता सौंदर्याची !
ती मृदुताही तारुण्याची !
प्रसन्नता अन् सुखशांतीची
मूर्त प्रियतमा होती त्याची.

तोंच उमललें बालमुखावर
सुंदर कोमल हास्य निरागस;
भान हरपुनी खिळले लोचन
निरखित स्मित तें लालस लोभस.

मोह अनावर होइ त्याजला
नवजाताचें घ्यावें चुंबन;
"जागृत होतां, यशोधरेला
कळतां राहिल का परिवर्तन ?"

अनामिकाने गगनांमधुनी
तोच घातली साद तयाला;
सिद्धार्थाच्या आत्म्यामधुनी
निमिषांतच पडसाद उमटला.

निद्रित होतें विश्व, आणि हा—
—चालत होता जागृतीकडे;
अंधारांतच विश्व आणि हा—
—चालत होता प्रकाशाकडे !

## ९ तीट जरा लावुं दे

अवखळा तुला जरा बांध मला घालुं दे
गोऱ्या गोऱ्या गालावर तीट जरा लावुं दे.
दुडूदुडू धावतांना जीव झाला थोडाथोडा
आवरूं मी कशी तुला खेळतांना घोडाघोडा ?
बाललीला पाहुनिया धन्य माय होवुं दे
गोऱ्या गोऱ्या गालावर तीट जरा लावुं दे.
खुदूखुदू हसतांना पडे गालावर खळी
पानाआड लपुनियां कशी गडे हंसे कळी
लबाड तूं तुझी मला दृष्ट जरा काढुं दे,
गोऱ्या गोऱ्या गालावर तीट जरा लावुं दे.
पुरे बाई पुरे खेळ नभीं आतां अंधारलं !
हात चिऊ काऊ ग, कुणी बाळां मारलं...
पदराच्या आड जरा झाकुनियां घेऊं दे.
गोऱ्या गोऱ्या गालावर तीट जरा लावुं दे.
रुणूंझुणूं रुणूंझुणूं नादतात पैंजण,
तुच्छ त्यापुढे मला सुमधूर गायन.
हेंचं गीत गात मला नादरूप होवुं दे,
गोऱ्या गोऱ्या गालावर तीट जरा लावुं दे.

## १० माझें मीपण गळून जावें

कधी कधी मज असें वाटतें
सिंधूंतिल मी थेंब होउनी
उगिचच भटकावें जीवनभर
तप्तसूर्यकिरणांशीं रमुनी.
क्षणभर जलदच व्हावें कणभर,
कण धरणीवर बरसुन जावें;
माझें मीपण गळून जावें.
कधी कधी मज असें वाटतें
सुमहृदयांतिल पराग बनुनी
वसुंधरेच्या निःश्वासांवर
अलगद अलगद जावें तरुनी.
पसरावा मीं सुगंध निळसर,
वातावरणीं विरून जावें;
माझें मीपण गळून जावें.
कधी कधी मज असें वाटतें
सुधांशुचा लघु किरण होउनी
धूलिकण उजळावा मीं तर;
—दबकत थबकत वनराजींतुनि
उतरावें अणुभर अवनीवर,
क्षण चमकुनि मी विलुप्त व्हावें,
माझें मीपण गळून जावें.
कधी कधी मज असें वाटतें
अनंत काळांतिल पळ बनुनी

रेंगाळावें निवांत पळभर,
भवितव्याची ओढ लागुनी
दीर्घ क्रमावें जीवन भरभर,
गलित पंख मीं मयूर व्हावें,
माझें मीपण गळून जावें,

क्रमांक ..........

# ११ प्रीति

पृथ्वीची सूर्यावर प्रीती
चकोर भुलतो चंद्रावरती
चातक जगतो मेघांवरती
कुणा न कळतां, कुणास्तव कुणी,
झुरतां प्रीती विझेल का ?
माझ्या प्रीतीची ही रीति
माझी प्रीतीवरती प्रीति
माझें जीवन माझी प्रीति
कुरवाळिलि तूं तिला ना जरी,
प्रीत गडे ही रुसेल का ?
तुला न कळली प्रीत आपुली
मीं ओळखिली मीं ओळखिली !
हृदयाच्या गाभ्यांत दडविली
कशास पटवूं प्रीतिखुणा मी ?
सांग प्रीत ही झुरेल का ?
कशास शृंगारावी काया ?
तुज भुलवाया ? तुज फुलवाया ?
प्रणयाराधन नकोच वाया !
जोवर हुरहुर अंतर जाळी
'ही' ज्वालेसम निमेल का ?
नयनांचे संकेत कशाला ?
नकळत कळतां स्पर्श कशाला ?
अस्फुट अधरीं शब्द कशाला ?
"तुलाच वरते माझी प्रीति
—प्रीत तुझी मज वरेल का ?"

तृ...३

हवेंच का व्हावयास मीलन ?
निःश्वासांची कोमल गुंफण
नवगीतांतुन—नवनृत्यांतुन—
—कशास उभवूं भावपिसारा
प्रीत कधी ही शमेल का ?
प्रीतीसाठी हिमतनुजेने
' हर ' हरवीला तपाबलाने
मुनिगण भ्रष्टविला मदनाने
शृंगाराने कशास भुलवूं ?
न मेनका ही, अनामिका !

## १२ दिवस असावा

दिवस असावा, आषाढांतिल स्नात सुशीतल
व्याप्त असावें, मेघावलिने, धुंद गगनतल;
इवलीं इवलीं तृणपातींही चिंब भिजावीं,
कणांकणांतिल चैतन्याची खूण पटावी.
गिरिशिखरांवर मेघांचें अवसान सरावें,
पवनाने चापल्य विसरुनी असें दडावें;
गाइगुरांच्या गळयांत घंटा मुग्ध असावी,
घरटयांतिल पक्ष्यांचीं गीतें तशीं थिजावीं.
वसुंधरा ही, नव्हेच, ही तर राधा भोळी !
जलक्रीडेस्तव नुकती या यमुनेंत उतरली,
कदंबावरी वस्त्र ठेविलें पिवळें पिवळें
बघता बघता बालरवीने कुठे दडविलें ?
बघत रहावें—
" पुन्हा पुन्हा गहिंवरुनी नभ हें देतच आहे
तृप्त तृप्त होउनि वसुधा ही घेतच आहे. "

## १३ तुझ्यांत मीं वितळावें

कधी बनुनी चंदन
अंग अंग लपेटावें;
वैजयंती माळेपरी
हृदयास आलिंगावें.

आरतिच्या अर्चीसम
यावें समीप समीप;
उजळावा अंधःकार
न्याहाळीत तुझें रूप.

व्हावें वाटे कधी कधी
स्निग्ध शुभ्र दूध दही,
आणि ओसंडावें जरा
तुझ्या अंगकांतीवरी.

धूप, दीप वा कर्पूर
बनूनिया जळावेंच;
कधी नैवेद्यासमान
मुख तुझें चुंबावेंच.

पुष्पसौरभापरी मी
अंतराळिं कोंदाटावें,
तुझ्या उष्ण निःश्वासांनी
थरारुनी रोमांचावें.

सनईच्या स्वरासवें
तरळत तरंगत
यावें, तुला निवेदावें
अधोमुख मनोगत.

कधीं बनुनी मेखला
कटीं विळखा घालावा;
अंगभूषणांनी देवा
देह तुझा शृंगारावा.

तुझ्या चरणीं नूपुर
होउनिया झंकारावें;
थांबतांच कोलाहल
तुझ्यांत मी वितळावें.

## १४ स्पंदन

कल्पाच्या आरंभीं
प्रजापतीची क्षणैक चळली
        सृजनशीलता;
आणखी क्षणांत,
मायावी संसार साकार जाहला
पृथ्वीचा पसारा क्षणांत थाटला;
ब्रह्मदेवाने मुक्तहस्ताने
दिले उधळून ईश्वरी गुण,
सागरां गांभीर्य, सृष्टीला सौंदर्य,
गगनां चैतन्य, पवनां चापल्य
        मेघांना कारुण्य;
खगांना गति, पशूंना शक्ति
दिवस–रात्रीला जागृति सुषुप्ति;
ऐश्वर्यसंपन्न कुबेर नगरी, भणंग जाहली,
प्रजापतीची गुणसंपदा अखेर सरली;
उपेक्षितसा पाहून मानव
गहिंवरला करुण अर्णव;
आपुल्या आत्म्याचा अल्पसा अंश
देऊनी म्हणे, "तूं ईश्वरी वंश!
मानवा, तूंच रे ईश्वरप्रेषित
तूंच रे, तूंच रे आमुचें इप्सित;
तुलाच दिधलें प्रज्ञेचें प्रदान.
संचार करण्या पृथ्वीचें प्रांगण;
यजनीं, नमनीं, मननीं, चिंतनीं,
पूजनीं, अर्चनीं, भजनीं, कीर्तनीं;

वांछावें मानवा विश्वाचें कल्याण
विश्वांत चाललें स्पंदन स्पंदन.

युगें लोटलीं, सरली जाणीव,
राहिली केवळ—केवळ नेणीव;
मानवां वाटलें, करावें आगळें, जगावेगळें
सूर्यास चुंबावें, अग्नीस स्पर्शावें
नक्षत्र तोडावें, विश्वास जिंकावें;
सरिताप्रवाह जरा थोपवावा,
अफाट सागरां बांध घालावा;
विहंगासमान व्योमीं विहरावें,
समुद्रगर्भात कधी वावरावें;
तरल स्वरांना ठेवावें गुंफून,
प्रकाशकिरण तसा गुंतवून;
चंद्रावरती करावी स्वारी,
मंगळ आणावा आपुल्या आहारीं;
कधीं लीलया अणु भेदावा,
पृथ्वीचा गोळा क्षणांत फोडावा;
तोडावें, जाळावें नंदनवन
विश्वांत चाललें स्पंदन स्पंदन.

उन्मत्त मानवा !
जगशी आपुल्या तंद्रींत गर्वांत,
कीटक क्षुद्र तूं विराट विश्वांत;
तुला न कळतें सृष्टीचें गाणें,
चंद्रसूर्याचें प्रकाश अर्पिणें,
वरुणदेवाचें अमृत वर्षणें,
वसुंधरेचें सदैव फुलणें,
कुणी ठेविला, तुझ्या हृदयीं आपुला अंश ?
कुणी रक्षिला अवतारुनी, मानव वंश ?

एवढें जाण तूं
एवढें मान तूं
मानवी कृतीला मृत्यूचें बंधन,
विश्वांत चाललें स्पंदन स्पंदन.
स्पंदनीं जन्मला पृथ्वीचा संभार,
स्पंदनीं विलय देतसे हुंकार,
ऐक ही दुंदुभि ! ऐक ही साद ! !
ऐक ही साद, दे पडसाद
रुद्रावताराचें क्षणांत चालेल--
तांडवनर्तन;
विश्वांत चाललें स्पंदन स्पंदन.

## १५ यौवन वळणांवर

कोण कुणाचा असशी नकळे
अनुसरण्या तुज पद आतुरले
मन्मनांतलें गूढ धावले
पसरुनि पंख विशाल आपुले,
तुझिया मार्गावर.

युगें युगें मी उभी एकली,
भृंगराज तूं, मी मुग्ध कळी
तुज रिझवाया ही फुललेली
रंगपरानें भुलविन तुजला
फुलवुनिया अंतर.

तव अधरीं मम अधररक्तिमा
नेत्रीं रेखिन नयननीलिमा
नवरंगें निर्मुनी प्रतीमा
चैतन्यातें श्वासहि ओतिन
तुझिया हृदयावर.

विरहाग्नीने तप्त धरित्री
अमृतधारा वर्षित अधरीं
अवतर तरि स्वर्गा, अवनिवरी
स्वदेहकलशांमधुनी ओतिन
जीवन चरणांवर.

नववधु सरिता मी लाजूनी
अशी थबकलें तुला पाहुनी
वाहुं दे तुझ्या हृदयांमधुनि
रत्नकांत तव बाहूपाशी
तरेन मरणावर

## १६ रूप आजच्या जगाचें

उंच स्वर्ग मंदिरांत
दंग देव शृंगारांत;
चंद्रमौळी झोपडींत
दीन भक्त दारिद्र्यांत;
किती प्रार्थिला दीनानी
देव आज प्रकटेना,
आणि आज भूपाळ्यानी
जाग त्याजला येईना;
देवभक्त दुःखी परी
सुखी पुजारी लक्ष्मीचे
रूप आजच्या जगाचें

जरी हृदय भंगलें
मनीं खंगती भावना,
जरी जगाने निंदीलें
पुरी जाहली वंचना;
जरी जगतांत वात
वाहतात निःश्वासांचे,
हंसूनिया अंतरांत
काढायचें-कण्हायचें,
रडायचें-पडायचें,
मृत्युस्तव जगायचें;
रूप आजच्या जगाचें

आज ज्ञान पंडितांचें
धुंद आपुल्या तंद्रींत;
आज सामर्थ्य शूरांचें
दंग आपुल्या गुर्मीत;
आज चित्त प्रेमिकांचें
विव्हळतें विरहांत;
आणि आज सौंदर्यही
रमेचिना पावित्र्यांत;
विश्व विविध ढंगाचें
फसवुनी फसायचें;
रूप आजच्या जगाचें

आज जगाच्या पेढींत
सुवर्णास भाव चढे;
भावविश्वाच्या वेशींत
प्रेमभाव घुटमळे;
आज खणाणतें नाणें
जवाहीर झगमगे;
कुणि ऐकेना गाऱ्हाणें
हीन दीन तगमगे;
आज बकासूर खाई
घांस लाख मानवांचे;
रूप आजच्या जगाचें

## १७ सह्याद्रीचा कडा

खडा असावा दृष्टीपुढती सह्याद्रीचा कडा.
सजल असावी धूसर श्यामल क्षितिजाचीहि कडा
डोंगरमाथ्यावर उतरावें अलगद जलद असे
तळरानाला हसें फुटावें हिरवट नि गर्दसें
सुमपर्णांनी फेर धरावा वायुलहरीवरी
तरुवल्लरिनी गूज वदावें तुंगगिरिकंदरीं
कर गुंफुनिया करांत खिदळत तरु येतां दौडत
बघुनी तिरपिट बालतृणांना वाटावी गम्मत
आंबट चिंबट आंब्यानेही भलतें बोलावें
अन् फणसाने सात्विकतेने अंग शहारावें
ध्यानमग्न वटवृद्धमुनीने क्षण जागृत व्हावें
दुडदुडणाऱ्या निर्झरणीला हळु गोंजारावें
घनराईंतुनि संथ तरंगत धुमवलयें यावीं
मानव्याच्या अस्तित्वाची साक्षच की द्यावी
कातरवेळीं जलवंतीनें 'पुरिया' अळवावा
दूर कुठे मंदिरांत घंटानाद निनादावा
एक चराचर एकलीच मी एक तुझा छंद
भाव अंतरीं गीतें अंधरीं दरवळतां गंध.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३७३५५ विः काव्य
क्रमांक १८४६३ नों: दि: २५.११.५६

## १८ गाऊं भारतयशगुणगान

आम्हीं भारतभूचे सेवक
विनम्र अवघें करुनी मस्तक
उजळूं पंचप्राण
गाऊं भारतयशगुणगान.
पवित्र तव अभिधान श्रवूनी
तनूंतनूंवर रोमांच फुले
सळसळती बाहू शौर्यानें
जीवन विकसित पावें अवघें
झरझर झरझर मेघ वर्षती
वसुधेवर ये नवथर लहरी
हिमालयाच्या तनुजा सुंदर
नादवीत नूपुर अवतरती
प्रियकर शांतिस्थान.
शुभ्र हिमालय मुकुट मस्तकीं
गंगा सिंधू हस्तद्वय की
महाराष्ट्र तव हृदयमंचकीं
विराटपुरुषा ! विराजतो की,
हरित हरित वनशोभेमधुनी
पक्षीगण सुश्राव्य गायनीं
चराचराच्या हृदयामधुनी
इथेच घुमते अभंगवाणी
जय जय हिंदुस्थान !
क्रौंचवधाने आद्यकवीला
करुणगीत स्फुरलें रामायण
इथेच यमुनातिराबर उभें
अमर प्रीतिचें अमर निकेतन.

इथे प्रकटली ‘ विवेकवाणी ’
धर्मध्वजा, विश्वांत मिरविण्या
‘ अरविंदांची ’ अक्षय वाणी
स्रवली जगता पावन करण्या
भारतभाग्य महान.

इथे घडविलें व्यासमुनीने
शब्दार्थांचें भारतलेणें
इथे प्राशिलें धनंजयाने
‘ भगवद्गीतामृत ’ प्रीतीने

इथे दिली गौतम बुद्धाने
मानवतेला महान दीक्षा
इथे प्रवचिली ‘ ज्ञानेशाने ’
जगीं वंद्य ‘ भावार्थदीपिका ’
अमुचें अमर निधान.

इथे जागला कुणी ‘ महात्मा ’
परसत्तेच्या भयाण रात्रीं
स्वतंत्रतेची प्रभात प्रभात फुलतां
घेइ चिरंतन निद्रा पुरती.

इथेच फिरती कुणा यतीचीं
भूदानास्तव वंद्य पाउलें
इथे कणांवर, जलबिंदूंवर
हौतात्म्याचें तेज आगळें
उन्नत अमुची मान.

इथे जिंकुनी या स्वार्थाला
इथे क्षाळुनी या हृदयाला
इथे विसरुनी या द्वैताला
जन भारतभूषण स्तवण्याला

प्रतिभा सात्त्विकतेने बहरो
जीवन मांगल्याने विलसो
आत्मा अध्यात्मानें उजळो
भारतभू तेजाने मिरवी
लाभो तुज कल्याण.

## १९ अशीच माझी रात्र संपते

शुभ्र धुक्याची मृदुल ओढणी
ओढुनि माथ्यावरीं सैलशी
रत्नफुलें हळुवार माळुनी
नित्यच करितें प्रतीक्षा अशी.
अभिसाराची नित्य नवी ही
अशीच करितें धुंद सजावट
अधीर अधरातुनी तशी मीं
गुंफित असतें प्रिया सुरावट.
निशिगंधाच्या निःश्वासांतुन
तुलाच रे मीं धुंडित असतें
निद्रित इवल्या सुमपर्णांतुन
चाहूल तुझी मी ऐकत असतें
रे तिमिरांतुन छेडित बसतें
चंद्रकरांच्या अगणित तारा
निर्झरणीच्या लयींत करतें
नूपुरांचा गूढ इषारा.
अशीच माझी रात्र संपते
—रात्र संपते रंगल्याविना;
अर्घ्यावरती गीत भंगतें
अनामिका, तं ऐकल्याविना.

## २० मुखवटा

स्फुंदुन स्फुंदुन रात्र संपली
अन् उरलेलें दिनभर जळणें;
स्वप्नमालिका कधींच तुटली
उरलें केवळ दुवे जोडणें.

हसावयला हवेंच आता
हसायचे ना तरी विश्व हें;
ना तरि जगतीं या अश्रूंचा
उगीच होइल की बोभाटा;
चढव मुखावर नवा मुखवटा.

आता आवर तव हृद्स्पंदन
दिवाभिताचें भेसुर क्रंदन;
अंधारांतिल निष्फल शोधन,
पिचलेलें तन, खचलेलें मन.

फसव जगाला, हसव मनाला
फसायचें ना परि अंतर्मन
अंधुक क्षितिजावर दिवसाची
ऐक दुंदुभी, भेरी, घंटा,
चढव मुखावर नवा मुखवटा.

अंगावरचें ताण कातडें
आण बळ जरी जीवन दुबळें;
डोळ्यांवरचें झाड झांपडें
उघडीं डोळे, मिटुनी बुबुळें;

तृ...४

हवेंच आतां जगावयाला
संतत मरणारें हें जीवन,
क्षणाक्षणाला मरतें मन त्या-
--यमनगरीचा हाच चव्हाटा;
चढव मुखावर नवा मुखवटा.

सत्तेपुढतीं लत्ता खाणें
बंदिजनांना प्राप्तच आहे;
मूढपणाने मानेवरचें
जूंहि वाहणें भागच आहे;

कुळवाड्याचे मळे बहरले,
धनवंताचे महाल सजले,
फटके खाउन, घुटके घेउन,
वृषभ परी हा ओढी मोटा,
चढव मुखावर नवा मुखवटा.

ऊर्ध्वमूळ 'अश्वत्थवृक्ष' हा
पाहिलास का ? त्या म्हणती 'भव;'
वटवाघुळ तें फांदीवरचें
म्हणजे आम्हीं विकसित मानव,

खालीं डोकें वरतीं पाय
उलटें अमुचें जीवित हाय !
तडफड करतों रडरड रडतों
जगण्याचा परि आटापीटा
चढव मुखावर नवा मुखवटा

## २१ मीहि अशीच उन्मन

माझें आडदांड मन
कधी उधळें चौखुर,
जाई क्षितिजकुंपण
उल्लंघुनिया चौफेर.

दोन ध्रुवांवर कधी
दोन टेकुन चरण
इंद्रधनूलाहि नभीं
लावितसे धीट बाण.

नील नभाची पोकळी
ह्याला अपुरी भासते
धरणीच्या कणांतहि
ह्याचें विश्व उमलतें

कधी हेंचि भेदितसें
दशदिशांची आडळ,
शिरीषाच्या श्वसनाने
कधी येतसे भोंवळ.

कधी सात सागरांत
रूप होतें मावेनासें
प्रतिबिंबतें दंवांत
आत्मरूप ठळकसें.

माझें आडदांड मन
होतें कधी अगोचर
मीहि अशीच उन्मन
धुंडाळतें चराचर.

क्र. ११९०८

## २२ क्रंदन

हे परमात्मन् !
प्रकृतीशी क्षणभर रमून,
तूं निघून गेलास तिथे.--
जिथे,– केवळ ज्ञान वाट चुकतें,
केवळ कर्म अंधळें बनतें,
जिथे श्रुतीचे पंख गळून पडतात,
अन् माया वेडीपिशी होते;
तिथेच तूं निघून गेलास.

विश्वामित्रासारखा,--
मेनकेचें सौंदर्य अव्हेरून,
सृजनाची हौस पुरवून,
नवजाताचा जन्म धिःकारून,
हे निर्विकारा !
तूं निघून गेलास.

तुझ्यामागें तुझी माया
मायाबंध तोडून गेली;
आणि माझ्या भ्रमंतीला
अंताविण सुरवात झाली !

अशीच, एकटीच—

कण्वमुनींच्या तपोवनांतील बालशकुंतलेसारखी
मी उमलत होतें.
मी उमलत होतें,
अष्टदिशादलकमलांत,
परागपरमाणूंच्या मंचकावर,

सौरभाची शाल लपेटून,
चंदेरी स्वप्नांत दंगत होतें.
मंद पवनाच्या करांगुलिस्पर्शाने—
—मी जागृत व्हावें;
प्राचीच्या कनककलशांतील केशरोदकाने,
मुख प्रक्षाळावें;
नील नभाच्या पुष्करणींत
अरुणोदयींच हरपलेलीं
लाख रत्नें धुंडाळीत,
मनसोक्त क्रीडावें.
ऋतुराज माझ्याचसाठी
नंदनवन निर्मून गेला;
चंद्रलोक त्यजून तारका
माझ्याचसाठी खालीं आल्या.
वरुणाने माझ्याचसाठीं
इंद्रधनुष्य घडविलें;
धुक्यांत लपून,
चंद्रकरांना नित्यच मी फसविलें.
प्राचीने रिझविलें, मावळतीनें जोजवलें.
असेंच होतें फुलत जीवन,
आणि असेंच फुलत आहे,
पण—
पण आतां फुलण्यांतच उन्माद नाहीं रे !
अन् झुरण्यांतहि ओढ नाहीं.
जीवनांतील गति नको आहे मला—
अन् मरणांतील मुक्तिहि.
हे जगन्नायका !
चिरयौवनाचा शाप दिलास तो दिलास,
पण उःशापाला पारखे कां केलेंस ?

तुझा शब्द मला कळतो
मेघगर्जनेंतून;
तुझा स्पर्श मला जाणवतो
वायुलहरींतून;
तुझें रूप मला आकळतें
स्वरूपांतून;
तुझी दया मला जगविते
जलधारांतून;
तुझा गंध मला फुलवितो
मृद्‌गंधांतून;

मी श्रमलें आहें रे--
मी सरलें आहें !
माझ्या क्रंदनाला
तुझ्या स्पंदनांत
स्थान नाहीं का ?

## २३ कशी ठेवूं पाय ?

कशी ठेवूं पाय
कणाकणांतुन
हरित जीवन
ओसंडतें !
कशी ठेवूं पाय ?
तृणातृणावर
मोतियांचा सर
ओघळेल !
कशी ठेवूं पाय ?
इवली इवली
पाकळी पाकळी
चुरडेल !
कशी ठेवूं पाय ?
फुलपांखरांचें
स्वप्न सुगंधाचें
भंगेल की !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
क्रमांक 363.55 वि: काव्य
क्र. 9433 नों. दि: 7-11-85

## २४ सौदामिनी

मेघांचा दुमदुमला तबला
पवनानें पांवरी घुमविली
सरितानीही षड्ज लाविला
स्वरवलयें जीवनीं उमटलीं
पाषाणांवर ऊर्मी खुलल्या
आतुरला अणु अणू अंतरीं;
सहस्रवधी धारा स्त्रवल्या
दिव्य गायनें गात भूवरीं
असंख्य वीणा छेडुन क्षणभर
कुणी घेतलें स्वर आवर्तन;
तोच नभाच्या रंगभूमिवर
सौदामिनिचें प्रकटें नर्तन !

## २५ आणि मला कळतसें

तुझीं नेत्र कबूतरें
करीतात कुजबुज
आणि मला कळतसे
तुझ्या अंतरीचें गुज

तुझ्या भ्रुकुटीचे बाण
तुझ्या नाहींत अंकित;
आणि मला कळतसे
तुझा गुलाबी संकेत

तुझे निळे निळे डोळे
भारी गहिरे गहिरे
आणि मला कळतात
भाव लाजरे लाजरे

तुझे नयनजलद
वर्षतात श्रावणांत
आणि मज कळतसे
माझ्याच तूं वियोगांत

तुझी नयनकोकिला
गाते लपून संगीत;
आणि मला कळतसे
तुझाच की मी वसंत !

## २६ ऐलतिराच्या पैलतिरावर

ऐलतिराच्या पैलतिरावर
नीरवतेच्या बांसरींतुनी
धुंद सुगंधी श्वास ओतुनी,
कोण देतसे अलगद उधळुन
अवकाशीं स्वरतंतू गुंफुन ?
साद मुग्ध त्या पैलतिराची
उमटविते पडसाद नुमटतां;
पैलतिराच्या ऐलतिरावर.

ऐलतिराच्या पैलतिरावर
मेघखंड हे काळवंडले,
स्वर्गधरेंतिल अंतर नुरलें,
कोण येतसें वितळत उजळत
छायेवरती प्रकाश बरसत ?
प्रकाशीत त्या पैलतिराची
दीप्ति प्रकटते विना प्रकटतां;
पैलतिराच्या ऐलतिरावर.

ऐलतिराच्या पैलतिरावर
अमूर्तहि दृष्टिपथांत येतें,
अव्यक्ताची ग्वाही पटते,
निशब्द अश्रुत श्रवणीं येतें,
अज्ञाताचें ज्ञान प्रकटतें,
गूढतेंतुनी अगूढतेचा
नकळत होतो स्पर्शहि कळता,
पैलतिराच्या ऐलतिरावर
ऐलतिराच्या पैलतिरावर.

## २७ आतां युगायुगासम

आतां युगायुगासम
भासतात क्षणमात्र;
चक्रवाक् वधुकेला
होय वैरी पद्मपत्र

आर्त नयनांस ओढ–
– रूप तुझें न्याहाळावें;
उरें श्वसनांना वेड
तुझे श्वास आलिंगावें

आतुरले सप्तस्वर
तुझ्या स्वरांत विराया;
आसुसले स्वप्नसर
तुझ्या लोचनीं फुलाया

आतां मन फुलेनाचि
सदा जळतें जळतें !
आतां तनू जळनाचि
सदा फुलते फुलते !!

आज साजशृंगारही
विसरला देहभान
उन्मन मीं भुललेंही
नृत्य, गान, पंचप्राण

तृप्ति.........'१९

## २८ बुद्धचरित गाउं या

भारतजनक श्रीगौतमबुद्ध चरित गाउं या.
उच्च, नीच, बाल, वृद्ध,
विद्वज्जन या प्रबुद्ध
पुरुषश्रेष्ठ युवति मुग्ध
बुद्धचरित गात गात शुद्धबुद्ध विसरुं या.
पर्वत, स्थितप्रज्ञा या,
हिमतनुजा, सरिता या,
दशदिग्ललनानो या,
ये मयूर, चक्रवाक्, शुक, पिक, कोकील या.
किन्नर, गंधर्वहि या,
नृत्यनिपुण नर्तक या,
शब्दसृष्टिईश्वर या,
काव्य, नृत्य, गायनांत नाचूं या, डोलुं या.
ये अरुणा उजळत तूं,
ये पवना, गंधित तूं,
ये वरुणा, वर्षित तूं,
रंग, गंध, मकरंदहि ओपित गीतांत या.
कणकण धरणी पुलकित,
नवप्रभात अणुअणूंत,
देवलोक हर्षभरित,
दंर्वबिंदू, जलबिंदू सिद्ध गेय गावया.
गौतम हा करुणार्णव,
मानवांत अतिमानव,
अमृतदाता अभिनव,
बुद्धचरित गात गात, आसवांत न्हाउं या.

## २९ फार दिवसांनी आली

फार दिवसांनी आली
माझी नेणंती माहेरां
सये, गहिंवरलाहि
माझ्या दारींचा मोगरा.
फार दिवसांनी आली
माझी साळुंखी छायेस
सूनबाई, जप बाई
शिक्यावरील लोण्यास.
फार दिवसांनी आली
बाळ माझी गुणवान
तिला चोळी जरी कांठी
आणा, केवड्याचें पान.
फार दिवसांनी आली–
–आली घेऊन शिसार;
भातांवर तुपाची ग
वाढ जरा मोठी धार.
फार दिवसांनी आली
लेक माझी नवसाची;
नका धाडुं ग पाण्यास
अशी उन्हाची–तान्हाची.
फार दिवसांनी आली
डोळा डोळ्यासी लागेना;
उद्या जायची सासरीं.
पाणी डोळ्याचं खळेना.

## ३० संत विनोबा

जशी हिमालय त्यजुनी गंगा
अवतरते अर्पिण्यास जीवन;
त्यजुनी आश्रम संत विनोबा
घेउनि आले नवसंजीवन.
जिथे उमटले तव पद तेथे
मातीचे होतात कनककण;
श्वास उमलला जेथे तेथे
पवनालाही ये पावनपण.
ऐकुनि तव मुखिची रसवंती
कणाकणांतिल ओवी जागृत;
छंदांतच खग नभीं विहरती
अभंगांत तृणपातीं दंगत.
अजिंठ्यांतले बुद्धदेवही
क्षण हर्षित तर, क्षण गहिंवरले;
कैलासांतिल शिल्पगुच्छही
बघतां बघतां सजीव झाले.
दिठींत गेलें विश्व वितळुनी
मिठींत झालें क्षितिज तोकडें;
प्रकाश जणुं हा तिमिर उजळुनी
ठोठावित चालला कवाडें.

## ३१ सांत्वन

माझं ढगाळलं नभ
झालं उदास उदास;
त्याची खुलवाया कळी
किती फुलवावा श्वास ?
उदासलं नभ त्याला
फुटे गर्द गहिंवर;
त्याचे पुसावया डोळे
किती उंचवावा कर !
माझं फाटलेलं नभ
रडे स्फुंदून स्फुंदून;
त्याचीं झेलाया आंसवें
उभी ओंजळ धरून.
माझं कोसळलं नभ
ओंजळींत ओसंडतें;
सावरितां सावरितां
पायतळीं उगवतें.

## ३२ दुःख

थिजणाऱ्या डोळियांनी
किती प्यावा गा प्रकाश ?
किती पहावें उडाया
विद्ध पंखांनी हताश ?
शुष्क ओठांनी आणावें
किती हंसण्याचें बळ ?
कसें फुलावें ? मनाचे
नाही बुजलेले वळ !!
आता नाठवें धरणी !
आता नाठवें आकाश !!
थिजणाऱ्या डोळियांनी
किती प्यावा गा प्रकाश ?

## ३३ सुख

सुख गगनाएवढं
मनीं मावतां मावेना;
माझ्या मनांतिल दूध
उतूं जायाचं राहिना !

पंख मिटले स्वरांचे
भावकंप स्थिरावेना;
पाय रक्ताळले तरी
मयूरनृत्य थांबेना !

तृ...५

## ३४ स्मृति

अशीच होती पायाखालीं तांबडमाती,
रुळलेले मम चरण नित्य या मार्गावरतीं;
निरुंद पुढतीं दाट आंबराईंतुनि वाट
निळसर, धूसर दूर उभा अन् डोंगरघाट.
घुटमळलेली क्षितिजाशी मधु संध्याराणी
नीलाकाशीं उदया आली एक चांदणी;
वसुंधरेवर श्रावणांतली हिरवी लाज
तरुलतिकांवर विविध फुलांचा सुंदर साज.
असावींच मीं फुलें माळलीं निशिगंधाचीं
गालीं खुललीं कर्णफुलें चंपककुसुमाचीं;
बाजुबंद मम इवल्या इवल्या बकुलफुलांचे
हातीं गजरे मंद सुगंधित प्राजक्ताचे.
नखानखावर मुग्ध रक्तिमा धुंद लाजरा
मुळि न कशी ती क्षिति चरणीं मुखरीत नूपुरां;
मृदुल शुभ्रतर वसन नेसुनी आलें होतें.
प्रियास सन्मुख वसंतसेना सजलें होतें.
शीतल हिरवळ चरणतलांना स्पर्शुन जातां,
अवचित स्मृति रे, तुझी मन्मनीं क्षण दरवळतां,
तुझी प्रतीमा चितारितें मी नयनीं कोरिव;
एकलीच मी, आता उरते केवळ जाणिव.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३८३५५.......... वि: ..........
क्रमांक ..२१८३३....... नों दि ..........

## ३५ आता वेदनेला पंख फुटले

जळते तारे खुलत आहेत,
खुलते वारे गात आहेत;
आज दुःख हसलें हसलें,
आता वेदनेला पंख फुटले.

खुपरी जाणीव तृप्त आहे,
आता द्वंद्व सरलें आहे;
आज गीत जुळलें जुळलें,
आता वेदनेला पंख फुटले.

आज स्वर्ग हताश नाही,
आता धरा अनाथ नाही;
आज मग गगन झालें,
आता वेदनेला पंख फुटले.

## ३६ माझा मराठाचि बोल.

माझा मराठाचि बोल
मानभावाच्या गर्भांत
जगां देतसे हुंकार
चक्रधर मायपूत.

माझा मराठाचि बोल
रांगतसे हळूहळू
धारितो मुकुंदराज
वेदवल्ली बाळकडू.

माझा मराठाचि बोल
रडे कधी धाईधाई
गहिंवरे ज्ञानराया
पाजी अमृतगीताई.

माझा मराठाचि बोल
कधी रुसतो फुगतो
गोंजारितो नामदेव
चोखामेळा नाचवितो.

माझा मराठाचि बोल
हुंदडतो लडिवाळे
जनी, मुक्ति पुरवीती
योगसुखाचे सोहाळे.

माझ्या मराठी बोलाचें
गोड बोबडें बोलणें
शब्दसृष्टीचे ईश्वर
लेववितो बाळलेणें.

माझा मराठाचि बोल
एकनाथांचें अंगूल
धरूनिया करीतसे
अध्यात्माची वाटचाल.

माझा मराठाचि बोल
बुडविला इंद्रायणी......
देवकीचें बाळ तान्हें !
आलें कालिया मर्दूनी !

माझ्या मराठी बोलाचे
गुरु संत रामदास
उकलुनी दावीती त्यां
प्रपंच नी परमार्थ.

माझा मराठाचि बोल
डफ, झांज, तुणतुणें
बाजवीत जागवितो
निद्रीत मराठीं मनें.

माझा मराठाचि बोल
दिव्य नभींचा भास्वत् !
नका धजूं स्पर्शण्याला
क्षणीं व्हास भस्मसात् !

## ३६ माझा मराठाचि बोल.

माझा मराठाचि बोल
मानभावाच्या गर्भांत
जगां देतसे हुंकार
चक्रधर मायपूत.

माझा मराठाचि बोल
रांगतसे हळूहळू
चारितो मुकुंदराज
वेदवल्ली बाळकडू.

माझा मराठाचि बोल
रडे कधी धाईधाई
गहिंवरे ज्ञानराया
पाजी अमृतगीताई.

माझा मराठाचि बोल
कधी रुसतो फुगतो
गोंजारितो नामदेव
चोखामेळा नाचवितो.

माझा मराठाचि बोल
हुंदडतो लडिवाळे
जनी, मुक्ति पुरवीती
योगसुखाचे सोहाळे.

माझ्या मराठी बोलाचें
गोड बोबडें बोलणें
शब्दसृष्टीचे ईश्वर
लेववितो बाळलेणें.

माझा मराठाचि बोल
एकनाथांचें अंगूल
धरूनिया करीतसे
अध्यात्माची वाटचाल.

माझा मराठाचि बोल
बुडविला इंद्रायणी......
देवकीचें बाळ तान्हें !
आलें कालिया मर्दूनी !

माझ्या मराठी बोलाचे
गुरु संत रामदास
उकलुनी दावीती त्यां
प्रपंच नी परमार्थ.

माझा मराठाचि बोल
डफ, झांज, तुणतुणें
वाजवीत जागवितो
निद्रीत मराठीं मनें.

माझा मराठाचि बोल
दिव्य नभींचा भास्वत् !
नका धजूं स्पर्शण्याला
क्षणीं व्हास भस्मसात् !

## ३७ आवाहन

नुकती कोठे विस्मित झाली
अल्लड, हसरी, बुजरी हरिणी;
अन् नुकती गुणगुणूं लागली
खुळी कोकिळा मधाळ गाणीं.

अर्धोन्मीलित नयनांपुढुनी
स्वप्नें मोहक तरळत होतीं;
थरथरणाऱ्या प्रत्यंगांतुनि
नवथर ऊर्मी उसळत होती.

अंतरांतलें गूढ अनामिक
अधराआडच दडलें होतें;
सजलें होतें सगळें केवळ
अभिव्यक्तिस्तव अडलें होतें.

निराकार साकारत होतें
असीम, अद्‌भुत, अबोध कांही—
—अबोध कांही, सुबोध कांही
पटावयाची होती ग्वाही

धडधडणाऱ्या उरांत माझ्या
तरल, सूक्ष्म संवेदन होतें.
मुग्धपणांतच मम हृदयाचें
वेड्या ! तुज आवाहन होतें !

## ३८ जीवित बनतें बिंदू केवळ

खिन्न अशा या कातरवेळीं
बसतों निश्चल निवांत निरखित
विस्मरणांतच जीं दडलेलीं
स्वप्नें मोहक नयनीं सजवित.
स्मृतिवलयें लघु, प्रदीर्घ बनतीं
जलवंतीच्या तरंगिणीसम
हेलावत हळुहळु विस्तारति
चुंबण्यास गगना गरुडासम.

या वलयांतच मधुराणी मम
प्रकटे जहरीं मधुस्मित फेंकित;
निःश्वसिते जी निशिगंधासम,
भ्रूभंगाने विखार ओतित.
क्षण हसुनी कुणि जातें निघुनी
वलयीं भरते पुन्हा खिन्नता;
गुंजारव कुणि करितें लपुनी
पुनश्च सलणारी नीरवता.

दृग्गोचर वलयीं होती क्षण
सायंतनिचे तुंग मनोरे;
रम्य सप्तरंगांची उधळण
भावसुमांचे गंधफुलोरे !
निमिषांतच स्वप्नांची कुजबुज
सरुनी जीवित भासें मृगजळ;
शून्यांतच शून्याची बेरिज
जीवित बनतें बिंदू केवळ !

## ३९ गंधगीता

गीत तुझें गंधाचें
गाउं नको गाउं नको,
चंचल मन माझें तर
त्यास पंख देउं नको.

सूर तुझे अमृतमय
त्यांत भाव ओतशील;
मन माझें बंधमुक्त
त्यास सखे उधळशील....

त्यांतुन लावण्यमास...
फुललेला कोश कोश...
खुललें मन भुललें जर,
देशिल तूं मजसि दोष.

तान तुझी जरतारी
सप्तकांत मिरवुं नको;
नादलुब्ध मन माझें
छंदांतच बुडवुं नको.

गायचेंच, गात रहा
मात्र सांग एवढेंच;
गुंफिलेंस जें स्वरांत...
गीत गडे ना तुझेंच ?

## ४० अजून—

अजून कणकण सह्याद्रीचा
स्पर्शाला तव आसुसलेला;
भयाण रात्रीं आठवणींचा
डोळा फुटतो अंधाराला !

झपाटलेला पिसाट वारा
गतकाळाची शोधित चाहुल
गिरीगव्हारीं वणवण फिरतो;
कधि न विसावे त्याचें पाउल.

शेवाळ्याची कांबळ सारुन
जलवंतीही हळूच बघते;
मर्द मावळ्याची का कुठुनि
शीळ खुणेची कानीं येते ?

जीर्ण गडाचा दगड दगडही
अश्रू गाळुनिया तडफडतो;
बुरुजावरचा भगवा ध्वजही
अगतिकतेने नित फडफडतो.

खूण दौडणाऱ्या खूरांची
वक्षावरतीं लेवुनि सजुनि
घरेस वाटे बेहोषपणे......
देहभान द्यावें उधळूनी...!

म्यानांतिल तरवार गंजली
म्यानांतच असहाय चुळबुळे;
मंदिरांतली शिणली 'आई'
वाटेला तव लावुनी डोळे.

पाषाणाचे थडगे फोडुनि
हळूच डोकावे 'अफझुलही'
वदतो-" सिंहाशींच झुंजुनी
-फवटाळावा पुन्हा मृत्यु मीं !"

अजून कणकण सह्याद्रीचा
स्पर्शाला तव आसुसलेला;
भयाण रात्रीं आठवणींचा
डोळा फुटतो अंधाराला !

# ४१ विरेलल्या गारा

मृदुलशा दुलईंत
अंग अंग शहारलें,
निळचा जांभळचा छायेंत
मन माझें मोहरलें.

अवचित प्रतिभेची
आली हृदयीं भरारी,
रास फुटली गारांची
आल्या सरीवर सरी.

धडपडुनी उठलें
शब्दजालीं गुंतवाया,
कळवळलें, स्फुंदलें
हातीं गारा विरलेल्या !!

## ४२ पायवाट

उजाड माळावरी एकली
पायवाट मी नित तळमळतें;
त्यक्त बहिष्कृत जगावेगळी
चैतन्याची वाट पाहतें.

वळत वळत अन् पळत कितिकदा
जातें, जणु मी निर्झर अवखळ;
लाख चिमुकल्या रानफुलांना
चुंबुन कथितें मनिची तळमळ.

बाभळबोरी कधी भेटतां
रेंगाळें घटकाभर पाउल;
उरांत सलणारी अगतिकता
उगिच परी घे खुळचट चाहुल.

क्वचित अवचित येतें उधळत
उनाड चुकलेलेंच वासरूं;
निमिषांतच परि परतें दौडत
रित्या मनीं घुमवीत घुंगरूं.

वाटें येथे सांध्यसकाळीं,
नित्य निनादावा घंटारव,...
हरित हरित श्रावणांतहि कुणीं...
आरंभावा मधु गुंजारव.

ओढ अंतरीं कधी अनावर
अधीर अधरें स्पर्शुन जावीं;
आतुर वांझेच्या हृदयावर
दुडकीं पदचिन्हें उमटावीं !

## ४३ तुझ्या माझ्या अबोल्यांत.

तुझ्या माझ्या अबोल्यांत
अबोलीचा रंग हवा;
आणि गडे रुसव्यांत
धुंद निशिगंध हवा.
तुझ्या माझ्या अबोल्यांत
लाजरिचा स्पर्श हवा;
आणि गडे झुरण्यांत
अहंतेचा डंख हवा.
तुझ्या माझ्या अबोल्यास
हवी हरिणीची दिठी;
बावरल्या नयनांच्या
नित व्हाव्या भेटीगांठी.
तुझा माझा अबोलाच
हवाहवासा रे मला !
मूक अनुराग तुझा—
—त्याचा भारी छंद मला !
तुझ्या माझ्या अबोल्यांत
ओढ हवी मीलनाची;
परी गडे मीलनांत
हौस हवी कलहाची !

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्र. ३७३५५........ वि: ........ काव्य
क्रमांक ९५४३...... नों. दि. १२-११-५८

## ४४ मंचक प्रभुचा रिता कां ?

कां अवचितसें वादळ झालें ?
रोहिणिचें जल कां थरथरलें ?
तारांकित नभ कां गहिंवरलें ?
स्तिमित धरा भ्रमतां भ्रमतां कां
मंचक प्रभुचा आज रिता कां ?

= कां तरुशिखरें विनम्र झालीं,
वेलीवरचीं फुलें उधळलीं ?
नक्षत्रें अगणीत उन्मळलीं ?
स्वप्न सरें फुलतां फुलतां कां ?
मंचक प्रभुचा आज रिता कां ?

= कभिन्न कातळ आज उले कां ?
हिमालयाचें हृदय द्रवे कां ?
आज कपिलनगरी व्याकुळ कां ?
नभिं स्पंदन कां, उरिं कंपन कां ?
मंचक प्रभुचा आज रिता कां ?

= वर्षेविण आवेग नदीला !
ऋतुराजाविण कुंज बहरला !
अरुणावाचुनि प्रकाश फुलला !
अघटित हो बघतां बघतां कां ?
मंचक प्रभुचा आज रिता कां ?

= छेडित नसतां वीणा कंपित,
रत्नदीप मंदिरांत थरकत,
अंगभूषणें अवचित निखळत
हिंदोलत झुंबर घंटा का ?
मंचक प्रभुचा आज रिता कां ?

= कां मजवर प्रभु रुसला बाई ?
गात, गात निजलें अंगाई;
आता तर मी राहुल-आई,
चुकलें पतिव्रत आचरितां कां ?
मंचक प्रभुचा आज रिता कां ?

= धुंडुं किती तुज कुंजांतुनि रे ?
किती किती प्रियकरा विनवुं रे ?
दमयंतीसम मी व्याकुळ रे !
नयनांतुनि झरती सरिता कां ?
मंचक प्रभुचा आज रिता कां ?

= गौतमिच्या गौतमबाळा ये !
ये कोमल राहुल जनका ये !
यशोधरेच्या प्राणप्रिया ये !
तरुविरहित जगते लतिका कां ?
मंचक प्रभुचा आज रिता कां ?

## ४५ छबकडी पतंगडी

घडीभर फडफडे
घडीभर दुडदुडे
छबकडी पतंगडी
—माझी, गगनांत उडे.

रमत गमत कधी,
गिरकत गिरकत;
लपत छपत कधी,
दबकत थबकत,
आडदांड गुलछडी
कधी तरुवरी अडे.

नुरे तिज भिडभाड
सुष्ट दुष्ट जगताची;
नुरे आता फिकीर त्या—
—उमंटांची, उद्दामांची;
जाणिवेच्या नेणिवेच्या
हुंदडते पलीकडे.

अवजड यंत्राची न
खडखड घडधड,
थडग्यांत सडणाऱ्या
जीवितांची तडफड,
भवबंध तोडुनी ही,
—निघे भावविश्वाकडे.

कविप्रतिभेची जणूं
मूर्त मुक्त भरारी ही;
महात्म्याची आत्म्याशींच
कुजबुज गूढ कांही;
जडसृष्टीतुनी दौडे
गूढ जीवसृष्टीकडे

स्थितप्रज्ञासम कधी
स्थिरावेल गगनांत;
ध्यानमग्न मुनीसम
रमे विश्वचिंतनांत;
देवाजिचा विश्वगाडा
धडपडे कड्याकडे.
छबकडी पतंगडी
पाहुनिया फडफडे.

आणि जीवनसूत्राची
लागतसे कटु ओढ;
मरणाची घरघर
जीव करी चरफड;

जगावें तुटुनी किंवा-
-परतावें मृत्युकडे
स्फुंदून स्फुंदून माझी-
-पतंगडी रडे, पडे !

तृ...६

## ४६ संकेत

ये तिथेच.
जिथे घुटमळे संथ समीरण,
जरा वेळुचें झुकलेलें बन,
क्षण छाया, क्षण प्रकाश गुंफण,
लाल लाल मातींत ताल,
वेचीत ये रे
क्षण नवेच;
ये तिथेच.

पायवाट ती छटेल उन्मन,
रहदारीचा डोळा चुकवुन-
-वळतांना...हटके चांफा पण,
पान पान ढाळीत भान......
धुंडीत ये रे
खूण तीच;
ये तिथेच.

लवलवतें हितगूज तृणाचें,
झळकत पिवळे तुरे उन्हाचे,
जेथे गुंजन अमनमनांचें,
गार गार निर्झरतुषार
स्पर्शीत ये रे
स्पर्श तेच;
ये तिथेच.

जेथुन दिसतें चंद्रबिंब पण,
चंद्रास न दिसणारच आपण;
तिथे जगा करबंदी बंधन,
गंध गंध उधळीत रंग,
    रंगांत ये गा,
    गीत तेंच;
    ये तिथेच.
उधळिन बकुलफुलें अनुसर ये,
पदचिन्हें मम अवलोकित ये,
पढविन वल्लरिना पूशित ये,
छुमछुम छननन् छुम छननन्
    संकेत रे ही
        नूपुरेंच;
            ये तिथेच.

## ४७ आज वेळ नाहीं मला

फुलपांखरांच्या सवें
मधुवनीं भ्रमायचें,
उमलत्या सुमनांत
गंधकण वेंचायचें;
अबोलीला वदवून
लाजरिला लाजवून,
तृणफुलांच्या स्वप्नींचें
गूढ जाणायचें मला;
आज वेळ नाहीं मला.

पवनाच्या पांवरिला
साथ आहे द्यावयाची,
सरितेच्या संगीताची—
—लय जरा जाणायची;
जलवंतीच्या उरांत
बहरला पारिजात
धुंद श्वसनांत तिच्या
मत्त व्हावयाचें मला;
आज वेळ नाहीं मला.

सागराचीं फेनफुलें
सांठवुनी ओंजळींत,
नाजूक रेखीव किती
लहरींत लहरत;
क्षितिजाच्या मंडपांत
रंगपंचमीचा थाट
उगवत्या किरणांत,
स्नात व्हावयाचें मला;
आज वेळ नाहीं मला.

सागराला किनाऱ्याची
ओढ निळी वेगळीच,
धरणीला गगनाची
जाग कांही आगळीच;
कणाकणांत धरेच्या
थेंबाथेंबांत जलाच्या
बिंदुबिंदूंत दंवाच्या
चैतन्याची साद मला;
आज वेळ नाहीं मला.

## ४८ आधार

मग खरंच दिवस मावळतो,
क्षितिजांतून प्रकाश पाझरतांना
मीं पकडून ठेवतें
एक किरण;
जेव्हा काळोखाच्या लाटेला
कांठ उरत नाही,
अन् क्षितिज, क्षितिज राहत नाही,
मात्र तेव्हा,
अंगुष्ठमात्र प्रकाशांत
पुन्हा पुन्हा डुंबत
मीं म्हणत असतें;
" या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी । "
मग रात्र विरुं लागते
प्रकाशाच्या धाकांत;
जेव्हा धुकें, धुकें उरत नाहीं
अन् आकाशांतील फुलं
कोमेजून माना टाकतात,
तेव्हाच मी भरून घेतें कलश
काळोखाच्या अमृताने;
सूर्य जळत असतो,
दिवस पळत असतो,
मीं मात्र पुन्हा पुन्हा
काळोखाचा घोट घेत
म्हणत असतें;
" यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः "

# ४९ बेहोष

शब्द झाला स्पर्श हळवा
छंद पुरता हो दिवाणा
हुंकारही झंकारला अन्
गात सुटलेला तराणा.
    चैत्र झाला चित्र ओलें
    –पेटल्या गुल्मोहराचें;
    श्रावणां लावण्य आलें
    स्नात पारीजातकाचें.
गंध गंधां हुंगुं लागे
रंग रंगीं रंगलेला;
चांदण्याचा वृक्ष माझ्या
अंगणीं मोहोरलेला !
    तूं प्रिया सन्मूख माझ्या
    धुंदींत मी, गीतांत मी;
    याच जाणीवेंत एका
    बेहोष मी, बेभान मी !

...काव्य
क. ...२५८३३....... नों. दि. १२-११-६५

# ५० निरोप

सख्या माझी दुनियेंत
दोन दिसांची सोबत;
ओवाळितें तुझ्यावरी
माझ्या जिवाची दौलत.

तुझ्यासाठीं सजविलें
घरकुल छानछान;
गोजिरासा कसा रांगे
बाळ गोरा गोरापान.

मेजावरी फुलदाणी
त्यांत डुलतो फुलोरा;
कोण आता फुलवील
स्निग्ध भावनापिसारा ?

फोटोवरी धूलिकण
पुसूनिया पदराने,
तुझी छबी न्याहाळील
कोण भरल्या डोळ्याने ?

गालावरी आसवांची
जेव्हा सांडेल मालिका,
तेव्हा गडे अधराने
कोण टिपेल मौक्तिकां ?

येतां घरीं संथपणे
कोण झांकिल नयन ?
कोमलशा अधरांचें
आता कोठलें मीलन !

तुझ्या स्मितानें फुललें
आसवांनी कोमेजलें;
तुझ्या जीवनगंगेंत
एक उदक सोडलें !

माझा भरला संसार
नको ठेवूं उणा बाई,
माझ्या गोड लाडक्याला,
छान एक आण 'आई.'

## ५१ भास

तुटलेले पंख असे
विटलेले रंग तसे,
हुकले स्वर जुळवुनि मीं
नादब्रह्म निर्मु कसें ?
घालुं कशी गगनाला—
—पंखांचें आच्छादन ?
देउं कशी स्वर्गाला
पृथ्वीचें अभिमंत्रण ?
रंगहीन जें तयास
रंग नवे देउं कसे ?
जें अमूर्त त्यास कशी—
—शब्दांचे देउं ठसे ?
हिरमुसलेली सतार
कुंचलाच अडलेला !
शब्द शब्द ओठावर
फसलेला, रुसलेला !!
परि, तुटल्या पंखांना
गगनाचा ध्यास कसा ?
अन् हताश अश्रूंना
स्वप्नांचा भास कसा ?

## ५२ माझ्या कवनांत असो

माझ्या कवनांत असो
धवलता धवळयांची;
सलगीची विनवणी
लडिवाळ मुक्ताईची.
माझ्या कवनांत असो
जनाइची भावलता;
संत सखूचा निर्धार
बहिणेची विरक्तता.
माझ्या कवनांत असो
पावित्र्य कान्होपात्रेचें;
प्रभुपदीं विसावलें
—तादात्म्य मिराबाईचें.
जात्यावरील ओवींत
माझी कविता गुंगते;
माउलीच्या भूपाळींत
जाग तिला नित्य येते.
पंचमीच्या भुलईंत
माझी कविता दंगते;
पाळण्याशीं विसावल्या
अंगाईंत आंदुळते.
माझ्या कवनाचें नातें
अक्षयाशीं, अमृताशीं;
विश्वचिंतनीं दंगल्या
संतलोचननीरेशीं !

# महाराष्ट्र—गीत

शिवनेरीच्या कुशींत कणकण पुलकित झालेला
पुन्हा तोरणा तोरण भाळीं बांधुन सजलेला
गोदाकांठी ज्ञानेशाची गहिंवरली ओवी
अभंगात वाहत्या पंढरी अवघी बुडलेली
फडफडतो ध्वज गडागडावर धडधडते नौबत
कोटि कोटि अधरांवर स्फुरलें महाराष्ट्र-गीत

इथें सावळें रूप घेतलें संस्कृत वाणीने
पाहियलें पाषाणदर्पणीं स्वरूप बुद्धाने
राजनीतिला वैराग्याने इथेच द्यावें धडे
प्राणपणाने सत्तांधासहि चारावेत खडे
फडफडला डफ पुन्हा सुंदरी लावणीहि लज्जित
कोटि कोटि अधरांवर स्फुरलें महाराष्ट्र-गीत

संताच्या दासीने येथे ओवावी ओवी
नायकिणीच्या पोरीने भक्तीही पचवावी
धन्य वीरमाता जियेने स्वदेश निर्मियला
झांशीच्या राणीने अवघा देशचि पेटविला
महदंबेच्या धवळचांमध्यें इथेंच हरि दंगत
कोटि कोटि अधरांवर स्फुरलें महाराष्ट्र-गीत

ठायीं ठायीं वीर गड्यांची इथे स्मारकें किति
मिटलेल्या पापणींत विझली स्वप्नांची आरति
इथें जाणलें गीतेमधलें रहस्य योग्याने
लाबियलें हृदयासी पददलिता नरश्रेष्ठाने
मायबोलिचा शब्दशब्द घे शत-खड्गांचें व्रत
कोटि कोटि अधरांवर स्फुरलें महाराष्ट्र-गीत

तुंग गिरीवर, त्यावर सुंदर डुलतें हिरवें वन
अवखळ निर्झर पदीं तयांच्या रुणझुणतीं पैंजण
गोपाळांचा घुमतो पांवा अन् झुलतें गोधन
संध्येच्या रंगात रंगतें इथें मराठी मन
महाराष्ट्र हा भारतभूचा कंठमणी शोभत
कोटि कोटि अधरांवर स्फुरलें महाराष्ट्र-गीत

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम ३०३५५ वि: काव्य
१६८३
REFBK-0011978
REFBK-0011978

## आमचें काव्य-प्रकाशन

| | | |
|---|---|---|
| १ | गडे तूं म्हण-( भावगीतें ) | ०-५० |
| २ | रुमझुम-ना. सी. फडके | १-०० |
| ३ | माझीं भावगीतें-बाबूराव गोखले | २-०० |
| ४ | छाया प्रकाश-आनंदीबाई लेले | २-०० |
| ५ | आम्बराई-गिरीश | २-२५ |
| ६ | जोगिया-ग. दि. माडगूळकर | ३-५० |
| ७ | चार संगीतिका-ग. दि. माडगूळकर | १-०० |
| ८ | अरुणा-भालचंद्र खांडेकर | २-०० |
| ९ | मेघालोक-प्रा. द. वि. जोग | २-०० |
| १० | जलवंती-'सुधांशु' | २-०० |
| ११ | मंदिर-के. अम्बादास | २-०० |
| १२ | बकुलफुलें-प्रा. प्रभाकर बिडवे | २-०० |
| १३ | गीतसुगंध-'सुधांशु' | ०-५० |
| १४ | तृप्ति-सुहासिनी इर्लेकर | २-०० |
| १५ | येरे येरे पावसा-वा. ना. विगम | ०-७५ |

कुलकर्णी ग्रंथागार, पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११९७८

कुलकर्णी ग्रंथागार, पुणे २.